


दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ८७ वा | गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# राणा सूर्यवंशींच्या कालठण फार्महाऊसभोवती संशयाचे वादळ !

## त्या रात्री सहा ते सात गाड्या आल्या, बाहेर पडल्या फक्त दोन ?

## अवघ्या २०-२५ मिनिटांत नेमके काय घडले ?

### हल्ल्यापूर्वी सोलापूर-बारामतीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कथित भेटीची चर्चा; रुग्णालयातून गायब झालेल्या सूर्यवंशींचा शोध आणि फार्महाऊसच्या तपासाचे आव्हान

**पुणे/ इंदापूर (कटूसत्य वृत्त) :** बारामती येथील वादग्रस्त उद्योजक राणा सूर्यवंशी यांच्यावरील कथित हल्ला, त्यानंतर पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयातून ते गायब झाल्याची घटना आणि आता इंदापूर तालुक्यातील कालठण नं. १ येथील कथित फार्महाऊसबाबत सुरू झालेली चर्चा, यामुळे संपूर्ण प्रकरणाभोवती संशयाचे वादळ निर्माण झाले आहे. हल्ल्याच्या घटनेतील अनेक प्रश्न अद्याप अनुत्तरित असतानाच, फार्महाऊसवर रात्रीच्या वेळी सहा ते सात चारचाकी वाहने आल्याची आणि त्यापैकी केवळ दोन वाहने बाहेर पडल्याची चर्चा पुढे आली आहे. हा घटनाक्रम खरा असल्यास, त्या रात्री अवघ्या २० ते २५ मिनिटांत नेमके काय घडले, हा प्रश्न तपासाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरू शकतो. मात्र, या वाहनांच्या हालचालींबाबत किंवा फार्महाऊसवरील कथित भेटींबाबत अद्याप अधिकृत पुष्टी झालेली नसल्याने या चर्चांची स्वतंत्र पडताळणी होणे आवश्यक आहे.





#### हल्ल्यापूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कथित भेटी ?

राणा सूर्यवंशी हे मूळचे माळेगाव येथील रहिवासी असल्याचे सांगितले जाते. हल्ल्याच्या दोन ते तीन दिवस आधीपासून ते बारामती–माळेगाव परिसरात वास्तव्यास असल्याची माहिती चर्चेत आहे. त्यातच हल्ल्यापूर्वीच्या आठवड्यात सोलापूर आणि बारामती परिसरातील काही वरिष्ठ अधिकारी कालठण नं. १ येथील कथित फार्महाऊसवर आल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यातील सोलापूरच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यास फार्म हाऊसच्या बाहेर आंब्याच्या झाडाखाली ३ ते ४ तास ताटकळत बसावे लागले होते त्याचे काही व्हिडिओ ही लवकरच व्हायरल होण्याची शक्यता आहे.

या कथित भेटींचे स्वरूप काय होते ? संबंधित अधिकारी कोणत्या कामासाठी तेथे गेले होते ? या भेटींचा राणा सूर्यवंशी यांच्यावरील कथित हल्ल्याशी काही संबंध आहे का ? की या भेटींचा हल्ला प्रकरणाशी काहीही संबंध नाही ? या प्रश्नांची उत्तरे अधिकृत माहिती आणि तपासातूनच मिळू शकतील. केवळ चर्चेच्या आधारे कोणत्याही अधिकाऱ्याच्या भूमिकेबाबत निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. मात्र, अशी भेट झाली असल्यास तिची वस्तुनिष्ठ पडताळणी होणे गरजेचे आहे.

#### 'त्या' रात्री सहा गाड्यांचे गूढ काय ?

रविवारी, २५ ऑक्टोबर रोजी राणा सूर्यवंशी रुबी हॉल रुग्णालयातून गायब झाल्याची माहिती समोर आल्यानंतर कालठण येथील फार्महाऊसबाबतची चर्चा अधिक तीव्र झाली. स्थानिक पातळीवर सुरू असलेल्या चचेर्नुसार, रात्रीच्या वेळी सहा ते सात चारचाकी वाहने फार्महाऊसमध्ये दाखल झाली. त्यानंतर सुमारे २० ते २५ मिनिटांच्या कालावधीत केवळ दोन वाहने बाहेर पडल्याचे सांगितले जात आहे.

या चर्चेची सत्यता तपासण्यासाठी अनेक बाबींची पडताळणी आवश्यक आहे. संबंधित वाहने नेमकी किती होती ? ती कोणाच्या मालकीची होती ? त्यातील व्यक्ती कोण होत्या ? सर्व वाहने एकाच वेळी दाखल झाली होती का ? फार्महाऊसमध्ये त्या काळात कोण उपस्थित होते ? वाहनांच्या आगमनाची आणि बाहेर पडण्याची वेळ काय होती ? या प्रश्नांची उत्तरे सीसीटीव्ही चित्रण, लोकेशन, कॉल रेकॉर्ड, प्रवेशद्वारावरील नोंदी, उपलब्ध डिजिटल पुरावे आणि संबंधित व्यक्तींच्या जबाबांतून मिळू शकतात.

या हालचालींचे ठोस पुरावे उपलब्ध असल्यास ते तपास यंत्रणांसाठी महत्त्वाचे ठरू शकतात. मात्र, वाहनांच्या संख्येबाबत किंवा आतील घटनांबाबत सध्या उपलब्ध असलेली माहिती ही चर्चेच्या स्वरूपातील असल्याने त्याला सिद्ध करून वस्तुस्थिती जनतेच्या समोर आणणे आवश्यक असल्याचे मत कायदा तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

#### फार्महाऊसची रचना आणि सुरक्षेची चर्चा

कालठण नं. १ येथील कथित फार्महाऊस उजनी धरणालगत असल्याचे सांगितले जाते. प्रशस्त परिसर, उंच सुरक्षा भिंती आणि खासगी सशस्त्र सुरक्षारक्षकांचा पहारा असल्याची माहिती स्थानिक पातळीवर चर्चिली जात आहे. तसेच, तेथे हेलिकॉप्टर उतरविण्यासाठी हेलिपॅड उभारण्यात आल्याचीही चर्चा आहे. या बाबींची अधिकृत पुष्टी झालेली नसल्याने फार्महाऊसची प्रत्यक्ष रचना, सुरक्षा व्यवस्था आणि संबंधित बांधकामांची स्थिती याबाबत अधिकृत नोंदी तपासणे आवश्यक आहे. मात्र, या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ झाली असल्याचा दावा केला जात असेल, तर त्या दाव्याची पडताळणी करणे तपासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल.

#### सासऱ्यांच्या जमिनीवरील फार्महाऊसचा दावा; मालकीची चौकशी होणार का ?

या फार्महाऊसच्या जमिनीच्या मालकीबाबतही परिसरात चर्चा सुरू आहे. सूर्यवंशी याने आपल्या सासऱ्यांच्या मालकीच्या जमिनीवर आलिशान फार्महाऊस उभारल्याचे दावे केले जात आहेत. तथापि, जमीन बळकावल्याचा ही आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. त्यामुळे या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट करण्यासाठी सातबारा उतारा, फेरफार नोंदी, खरेदीखत, मालकी हस्तांतरणाची कागदपत्रे आणि बांधकामासंबंधीच्या परवानग्यांची पडताळणी संबंधितांसह पोलीसांनी करणं आवश्यक असल्याचे मत जानकरांकडून व्यक्त केलं जात आहे.

जमिनीच्या मालकीवरून काही वाद असल्यास त्याची कायदेशीर कागदपत्रांच्या आधारे चौकशी होणे गरजेचे आहे. अफवा किंवा ऐकीव माहितीच्या आधारे कोणालाही दोषी ठरविण्याऐवजी नोंदी तपासून सत्य समोर आणणे महत्त्वाचे आहे.

#### १८ ऑक्टोबरला हल्ल्याची तक्रार; २५ ऑक्टोबरला रुग्णालयातून गायब

१८ ऑक्टोबर रोजी बारामती विमानतळाजवळ आपल्यावर हल्ला झाल्याची तक्रार राणा सूर्यवंशी याने पोलिसांकडे केल्याचे वृत्त समोर आले होते. त्यानंतर त्याच्यावर पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती होती. मात्र, २५ ऑक्टोबर रोजी तो रुग्णालयातून गायब झाल्याची बाब समोर आल्यानंतर प्रकरणाला वेगळे वळण मिळाले. सूर्यवंशी याच्यावरील कथित हल्ला आणि त्यानंतरच्या घटनांबाबत विविध दावे आणि संशय व्यक्त केले जात आहेत. हल्ला घडवून आणण्यामागे वेगळे कारण होते का, या घटनेत आणखी कोणाचा सहभाग होता का आणि सूर्यवंशी रुग्णालयातून नेमका कसा बाहेर पडला, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

मात्र, हल्ला बनावट असल्याचे समोर दिसत असताना सुद्धा राणा सुर्यवंशी याला पोलिस अटक का करत नाहीत. असा प्रश्न भिगवन, करमाळ्यासह महाराष्ट्रातील जनता विचारत आहे. रुग्णालयातील प्रवेश–निर्गमन नोंदी, उपलब्ध सीसीटीव्ही चित्रण, त्या वेळी उपस्थित असलेल्या व्यक्तींचे जबाब आणि सुरक्षा व्यवस्थेची माहिती तपासल्यास या प्रश्नांची उत्तरे मिळण्यास मदत होऊ शकते.

#### वाय-प्लस सुरक्षा व्यवस्थेचे काय झाले ?

सूर्यवंशी यांना कथित हल्ल्यानंतर वाय–प्लस सुरक्षा पुरविण्यात आल्याची चर्चा आहे. ही सुरक्षा नेमक्या कोणत्या आदेशानुसार मंजूर करण्यात आली होती ? सुरक्षेची जबाबदारी कोणाकडे होती ? संबंधित सुरक्षा कर्मचारी त्या वेळी कुठे होते ? रुग्णालयातून सूर्यवंशी बाहेर पडत असताना सुरक्षा व्यवस्था कार्यरत होती का ? या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे.

सुरक्षा व्यवस्थेबाबतचे अधिकृत आदेश, तैनातीची नोंद आणि संबंधित कर्मचाऱ्यांचे जबाब तपासल्याशिवाय निष्काळजीपणाचा निष्कर्ष काढता येणार नाही. मात्र, एखाद्या व्यक्तीच्या सुरक्षेबाबत विशेष व्यवस्था करण्यात आली असेल आणि त्यानंतर ती व्यक्ती अचानक गायब झाल्याचे समोर आले असेल, तर त्या व्यवस्थेची कार्यपद्धती तपासणे ही यंत्रणांची जबाबदारी ठरते.

#### काळ्या वाहनांच्या चर्चेमुळे तर्कवितर्क

राणा सूर्यवंशी याच्या वाहनांचा रंग काळा असल्याची माहिती स्थानिक पातळीवर चर्चिली जात आहे. त्यामुळे फार्महाऊसवर दाखल झालेल्या वाहनांचा त्याच्या ताफ्याशी संबंध होता का, याबाबत तर्कवितर्क सुरू आहेत. त्यामुळे राणा सुर्यवंशी हा फार्म हाऊसवर येऊन पुरावे नष्ट करुन गेला का ? असाही प्रश्न उपस्थित झाला आहे. मात्र, केवळ वाहनांचा रंग समान असल्याने ती वाहने सूर्यवंशी यांचीच होती का ? का पोलीस तपासासाठी आले होते याचा निष्कर्ष पोलीस तपासातूनच काढता येणार आहे.

वाहनांचे क्रमांक, मालकीची कागदपत्रे, प्रवेशाच्या वेळा आणि उपलब्ध सीसीटीव्ही चित्रण यांच्या आधारेच या दाव्यांची पडताळणी होऊ शकते. फार्महाऊसच्या परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा असल्यास त्यातील चित्रण जतन करून तपासणे, तसेच संबंधित नोंदी उपलब्ध करून घेणे महत्त्वाचे ठरेल. वहानांच्या जीपीएस वरुन तपास काढता येईल.

#### पोलिसांच्या तपासाची दिशा काय ?

या प्रकरणात संशयितांना अटक झाल्याचे वृत्त समोर आले असतानाच तक्रारदारच गायब झाल्याची बाब तपास यंत्रणांसमोर नवे आव्हान उभे करणारी आहे. कालठण येथील कथित फार्महाऊसबाबत सुरू झालेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी या ठिकाणाची अधिकृत पाहणी केली आहे का, वाहनांच्या कथित हालचालींची माहिती घेतली आहे का आणि हल्ल्यापूर्वीच्या कथित भेटींची पडताळणी केली आहे का, याबाबत स्पष्ट माहिती समोर येणे आवश्यक आहे.

तसेच, या प्रकरणातील तपास अधिकाऱ्यांना फार्महाऊसबाबतच्या चर्चेची माहिती आहे का, असल्यास त्यावर कोणती कार्यवाही झाली आहे, याबाबतही अधिकृत खुलासा महत्त्वाचा ठरणार आहे. पोलिसांच्या गस्तीवरीही प्रश्न उपस्थित झाले आहेत. संबंधित क्षेत्रातील गस्त नोंदी, उपलब्ध माहिती आणि पोलिसांनी केलेल्या कार्यवाहीचा तपशील तपासणे आवश्यक आहे.

#### चर्चा नव्हे, पुरावे बोलले पाहिजेत!

राणा सूर्यवंशी याच्यावरील कथित हल्ला, रुबी हॉल रुग्णालयातून त्याचे गायब होणे आणि कालठण येथील फार्महाऊसबाबत सुरू झालेली चर्चा या घटनांचा परस्पर संबंध आहे की नाही, हे आतापर्यंत तपासातून स्पष्ट होणे आवश्यक होते. ते न झाल्याने पोलीस अधिकारीच संशयाच्या भोवऱ्यात ओढले जात आहेत.

मात्र, त्या रात्री सहा ते सात वाहने आल्याचा दावा, त्यापैकी केवळ दोन वाहने बाहेर पडल्याची चर्चा आणि हल्ल्यापूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कथित भेटींची माहिती याकडे दुर्लक्षही करता येणार नाही. या बाबींची सत्यता पडताळण्याची मागणी रास्त आहे. फार्महाऊसवरील कथित हालचालींचे पुरावे उपलब्ध असल्यास ते तपासाच्या कक्षेत आणले जातील का, सूर्यवंशी याचा ठावठिकाणा शोधण्यासाठी कोणती पावले उचलली जात आहेत आणि हल्ल्याच्या तक्रारीमागील संपूर्ण घटनाक्रम कधी स्पष्ट होणार, हे प्रश्न अनुत्तरित आहेत.

#### त्या रात्री फार्महाऊसवरून कागदपत्रे हलवली ?

पुरावे नष्ट करण्यासाठी गाडी भरून कागदपत्रे नेल्याची स्थानिकांत चर्चा; तपास यंत्रणा काय करणार ? राणा सूर्यवंशी यांच्या कालठण येथील फार्महाऊसभोवती सुरू असलेल्या चर्चांना आता नवे वळण मिळत आहे. संबंधित रात्री फार्महाऊसवरून गाड्या भरून कागदपत्रे बाहेर नेण्यात आल्याची चर्चा स्थानिकांमध्ये रंगू लागली आहे. ही कागदपत्रे नेमकी कोणती होती, ती कोठे नेली आणि त्यामागील उद्देश काय होता, असे सवाल उपस्थित होत आहेत. पुरावे नष्ट करण्यासाठी कागदपत्रे हलवण्यात आली का, हा संशयही व्यक्त केला जात आहे.

मात्र, या चर्चेला अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. त्यामुळे तपास यंत्रणांनी फार्महाऊसवरील सीसीटीव्ही फुटेज, वाहनांची ये–जा, संबंधित व्यक्तींचे जबाब आणि कागदपत्रांच्या हालचाली यांची निष्पक्ष पडताळणी करणे आवश्यक आहे. स्थानिकांमधील चर्चा खरी की केवळ संशयाचे धुके, याचा उलगडा तपासातूनच झाला पाहिजे. कथित हल्ला प्रकरणातील प्रत्येक संशयास्पद बाबीची सखोल चौकशी करून सत्य जनतेसमोर आणण्याचे आव्हान आता तपास यंत्रणांसमोर आहे.

आता गरज आहे ती पारदर्शक तपासाची. अफवांचे धुके दूर करून दस्तऐवज, डिजिटल पुरावे, सीसीटीव्ही चित्रण आणि संबंधित व्यक्तींच्या जबाबांच्या आधारे सत्य समोर आणणे हेच या प्रकरणातील सर्व प्रश्नांना उत्तर देऊ शकते. कालठणच्या कथित फार्महाऊसवरील चचेर्चे वास्तव तपासातून स्पष्ट होणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## चार आमदारांचे मामा अनगरचे राजन पाटील !



### सोशल मीडियावर रंगली जोरदार चर्चा




**अनगर (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या अनगरच्या राजन (मालक) बाबुराव पाटील यांच्या नावाची सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगताना दिसत आहे. 'चार आमदारांचे मामा अनगरचे राजन पाटील !' या चर्चेने राजकीय वतुर्ळाचे लक्ष वेधून घेतले आहे. आमदार अमरसिंह पंडित, आमदार विजयसिंह पंडित, आमदार प्रतापसिंह पाटील आणि आमदार राहुल पाटील या चार आमदारांशी राजन पाटील यांचे मामाचे नाते असल्याची चर्चा सोशल मीडियावर होत आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावणारे, महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष तथा माजी आमदार राजन पाटील यांची अनगर परिसरात प्रभावी राजकीय ओळख आहे. सहकार, साखर कारखानदारी आणि सार्वजनिक जीवनातील त्यांच्या कायार्मुळे ते सातत्याने चर्चेत असतात. आता चार आमदारांशी असलेल्या कौटुंबिक नात्याच्या चर्चेमुळे त्यांच्या नावाची राज्याच्या राजकीय वर्तुळात नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

राजकारणात एखाद्या नेत्याची ताकद त्याच्या पदावरून मोजली जाते; मात्र कौटुंबिक नातेसंबंधही अनेकदा चचेर्चा विषय ठरतात. अमरसिंह पंडित, विजयसिंह पंडित, प्रतापसिंह पाटील आणि राहुल पाटील या चार आमदारांचे मामा म्हणून राजन पाटील यांचा उल्लेख सोशल मीडियावरील चर्चेत केला जात आहे. त्यामुळे 'चार आमदारांचे मामा' हे संबोधन सध्या चर्चेत आले आहे.

या चर्चेमुळे अनगरच्या पाटील कुटुंबाचे राजकीय वर्तुळातील महत्त्व आणि राज्यातील विविध राजकीय कुटुंबांशी असलेले संबंध याकडेही लक्ष वेधले जात आहे. विशेष म्हणजे, एकाच कुटुंबातील व्यक्तींच्या राजकीय वाटचालीपेक्षा वेगवेगळ्या मतदारसंघांतील चार आमदारांशी असलेले नाते चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे.

(पान 2 वर..)




## पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपचा बालेकिल्ला गडबडला

### हर्षदा जाधव यांचा दणदणीत विजय!



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** पुणे पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत हर्षदा जाधव यांनी भाजपच्या उमेदवार स्मिता जाधव यांचा पराभव करत विजय मिळवला आहे. आज जाहीर झालेल्या निकालात हर्षदा जाधव यांना १ लाख १३ हजार ९५ मते मिळाली.

त्यांनी स्मिता जाधव यांच्यापेक्षा ९ हजार ७०० मतांची आघाडी घेतली. मतमोजणीच्या सुरुवातीपासून दोन्ही उमेदवारांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली. मात्र, पुढील टप्प्यांत हर्षदा जाधव यांनी आघाडी मिळवत विजय निश्चित केला. या निकालामुळे पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपला पराभवाचा सामना करावा लागला असून, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. पुणे पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जिंकण्यासाठी भाजपने जोरदार तयारी केली होती. पक्षातील वरिष्ठ नेत्यांनीही प्रचारात सहभाग घेतल्याने या निवडणुकीकडे विशेष लक्ष लागले होते. मतमोजणी सुरू झाल्यानंतर हर्षदा जाधव आणि स्मिता जाधव यांच्यात मतांसाठी चुरस निर्माण झाली. सुरुवातीच्या टप्प्यांत दोन्ही उमेदवारांमध्ये अटीतटीची लढत सुरू होती. मात्र, मतमोजणी पुढे सरकत असताना हर्षदा जाधव यांनी आघाडी वाढवली आणि अखेर विजयावर शिक्कामोर्तब केले. त्यांना एकूण १ लाख १३ हजार ९५ मते मिळाली. स्मिता जाधव यांच्यापेक्षा ९ हजार ७०० मते अधिक मिळाल्याने त्यांनी हा मतदारसंघ जिंकला.

(पान 2 वर..)

## शिक्षक मतदारसंघातील प्रतिनिधित्व कोल्हापूरकडेच

### विरोधी आव्हाने मोडत कौस्तुभ गावडेंचा विजय

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** पुणे शिक्षक मतदारसंघातील विधान परिषदेचे प्रतिनिधित्व कोल्हापूर जिल्ह्यातच कायम राहिले आहे. गेल्या निवडणुकीत काँग्रेसकडून विजयी झालेले प्रा.जयंत आसगावकर यांना त्यांची निष्क्रियता नडली.

तर महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या शिंदे सेनेचे बंड आणि 'झेन झी' भाजपच्या विरोधात असल्याचा सूर मोडून काढत कौस्तुभ गावडे यांच्या रूपाने पुन्हा एकदा या मतदारसंघात भाजपचा भगवा फडकला आहे.

पुणे शिक्षक मतदारसंघात यावेळी दुहेरी बंडखोरी झाल्याने भाजपसमोर कडवे आव्हान उभे ठाकले होते. पश्चिम महाराष्ट्रात शैक्षणिक संस्थांचे मोठे जाळे असलेल्या स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी रिंगणात उतरवण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष म्हणून प्रयत्न केले होते. तर



त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाठबळ दिले होते.

#### युवा चेहरा भावला

गावडे यांची उमेदवारी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत जाहीर झाली तेव्हा गावडे यांनी शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने सहकार्य केले नाही तर प्रसंगी रस्त्यावर उतरावे लागेल, असेही स्पष्टपणे सांगितले होते. त्यांचा हा स्पष्टवक्तेपणा, शिक्षकांच्या विविध आंदोलनातील सक्रिय सहभाग, तरुण वय, चंद्रकांत पाटील यांनी उभी केलेली प्रचाराची यंत्रणा, शिक्षक संघटनांसह भाजप

(पान 2 वर..)

## संपादकीय

# ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याने लोकशाही कशी वाचेल?

भारत हा मतदार संख्येच्या दृष्टिकोनातून जगातील सर्वात मोठा लोकशाही देश! ही लोकशाही टिकून आहे नागरिकांना मिळालेल्या मतदानाच्या अधिकारावर आणि निष्पक्ष निवडणुकांवर– आणि या दोन्ही गोष्टींचे अस्तित्व अबाधित ठेवण्याची जबाबदारी ज्या संस्थेवर आहे ती म्हणजे भारतीय निवडणूक आयोग!

त्यामुळे एका अर्थाने भारतीय लोकशाहीचे पावित्र्य निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर अवलंबून आहे. त्यानुसारच भारतीय संविधानाने निवडणूक आयोगाची रचना केली आहे. निवडणूक आयोग ही संविधानिक संस्था आहे. पण गेल्या काही वर्षांत निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेला तडा जात आहे. आयोगाच्या कारभाराबद्दल, संगणक प्रणालीतील संशयास्पद ठरणाऱ्या दोषांबद्दल शोध पत्रकारितेमधून आजवर अनेक उघड झालेल्या आहेत. इंडियन एक्सप्रेसने २३ सप्टेंबर रोजी या संदभार्तील पहिली बातमी दिली आणि त्यानंतरच्या महिनाभरात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलनाला धार आली. पण गेल्या आठ वर्षांत निवडणूक व एकंदर लोकशाही प्रक्रियेत आणवले गेलेले दोष केवळ एका व्यक्तीच्या राजीनाम्यामुळे दूर होणार नाहीत. ते कसे हे समजण्यासाठी मागील काही वर्षांत निवडणूक आयोगाची प्रतिमा डागाळत जाण्यासाठी कारणीभूत असलेल्या प्रमुख घटनांचा आढावा घेणे आवश्यक आहे.

निवडणूक प्रक्रियेतील महत्वाचा भाग म्हणजे पक्षांना मिळणारा निधी. कोणत्या पक्षाला कोणाकडून आणि किती निधी मिळाला याबाबत पारदर्शकता असणे गरजेचे असते परंतु २०१८ साली केलेल्या निवडणूक रोख्यांच्या (इलोक्टोरल बॉण्ड्स) तरतूदीने ही पारदर्शकता नष्ट केली. याचा फायदा सहाजिकच सत्ताधारी पक्षाला झाला. नंतर सर्वोच्च न्यायालयाने हा कायदा घटनाबाह्य ठरवून रद्द केला.

त्यानंतर २०२२ मध्ये जम्मू-काश्मीर राज्याचे परिसीमन करण्यात आले. परिसीमन करण्यासाठी स्वतंत्र आयोग स्थापन करण्यात येतो, परंतु यामध्ये निवडणूक आयोगाचीही महत्त्वाची भूमिका असते. केंद्रशासित प्रदेश झालेल्या जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभेच्या जागा ८३ वरून ९० करण्यात आल्या. यामध्ये जम्मूला ६ तर काश्मीर खोऱ्याला १ नवीन जागा असे विषम वितरण करण्यात आले. २०२३ मध्ये आसाम राज्यात परिसीमन करण्यात आले. त्यात विधानसभेच्या जागा कायम ठेवण्यात आल्या मात्र भौगोलिक सीमांमध्ये मोठे आणि अतार्किक बदल करण्यात आले. प्रशासकीय व भौगोलिक निकषांऐवजी विशिष्ट ध्रुवीकरणासाठी फेररचना केल्याचा आरोप प्रादेशिक घटकांकडून करण्यात आला आणि ते तितकेच सहाजिकही होते.

मतदार नोंदणी संदर्भातील फॉर्म ७ (नमुना ७) च्या नियमांमध्ये २०२२ साली बदल करण्यात आले. फॉर्म ७ प्रामुख्याने मतदारयादीतून नाव वगळण्यासाठी वापरला जातो. स्वतःचे नाव वगळण्यासाठी, तसेच इतर अपात्र मतदाराचे नाव वगळण्यासाठी आणि त्याचबरोबर मतदार यादीत समाविष्ट केल्या जाणाऱ्या एखाद्या अपात्र व्यक्तीच्या नावावर आक्षेप नोंदवण्यासाठी याचा वापर होतो. पूर्वी ज्या यादीभागामध्ये संबंधित मतदाराचे नाव होते त्याच यादीमधील मतदाराला आक्षेप घेता येत होता; परंतु २०२२ मधील बदलानंतर आता संपूर्ण विधानसभा मतदारसंघातील कोणताही नोंदणीकृत मतदार दुसऱ्या मतदाराचे नाव वगळण्यासाठी फॉर्म ७ दाखल करू शकतो. या बदलामुळे अनेक राज्यांमध्ये मतदारांच्या विशिष्ट, लक्ष्यित गटांविरुद्ध आक्षेप घेतले गेले आहेत. अनेक अर्जांमध्ये आक्षेपकर्त्याचा अनिवार्य तपशील नव्हता, त्यात अवैध मोबाईल क्रमांक किंवा मतदार कार्ड तपशील होते. याबाबत स्वतः लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी वेळोवेळी गौप्यस्फोट केला आहे.

शिवसेना पक्ष २०२२-२३ मध्ये फोडण्यात आला, तेव्हा निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या गटाला मूळ 'शिवसेना' नाव आणि 'धनुष्यबाण' हे चिन्ह बहाल केले. पुढे राष्ट्रवादी काँग्रेस आणि नंतर तृणमूल काँग्रेस बाबत काय झाले हे सर्व देशाने पाहिलेच आहे. चार वर्षे उलटून गेली तरी सर्वोच्च न्यायालयाने शिवसेना पक्ष व चिन्हासंदभार्तील निर्णय दिलेला नाही. असोशिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) संस्थेने केलेल्या अभ्यासानुसार मागील चार वर्षांत निवडून आलेल्या १११ आमदार/ खासदारांनी स्वतःचा पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात प्रवेश केला आहे. ही त्या सर्वांना मत देणाऱ्यांची क्रूर थट्टाच आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त यांच्या नियुक्तीबद्दलचा कायदा २०२३ साली बदलण्यात आला. या कायद्याने १९९१ च्या निवडणूक आयुक्तांसंबंधी कायद्याची जागा घेतली. नवीन कायद्यानुसार आयुक्तांच्या निवड समितीमध्ये पंतप्रधान, पंतप्रधानांनी नामनिर्देशित केलेले केंद्रीय मंत्री आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते यांचा समावेश असेल. या समितीवर सत्ताधारी पक्षाचा वरचष्मा राहावा, अशीच ही तजवीज होती. तसेच कायद्यातील कलम १६ नुसार निवडणूक आयुक्तांना फौजदारी आणि दिवाणी कारवाईपासून कायदेशीर संरक्षण देण्यात आले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त किंवा निवडणूक आयुक्तांनी त्यांच्या अधिकृत कर्तव्याच्या पालनादरम्यान केलेल्या कोणत्याही कामासाठी, निर्णयासाठी किंवा विधानासाठी त्यांच्याविरुद्ध कोणत्याही न्यायालयात दिवाणी वा फौजदारी खटला चालवला जाऊ शकत नाही. हे संरक्षण आजीवन असेल. म्हणजे पदावर असताना आणि पद सोडल्यानंतरही (निवृत्तीनंतरही) ते लागू राहाते. म्हणजेच, त्यांनी पदावर असताना घेतलेल्या निर्णयांवरून त्यांना नंतरही न्यायालयात खेचले जाऊ शकत नाही. सत्ताधाऱ्यांचे चरित्र बघता अशा कायद्याचा वापर करून आपल्या मर्जीतील व्यक्तीची नेमणूक करायची आणि त्याने केलेल्या कुकर्माबद्दल त्याला तहहयात शिक्षा होणार नाही याची तरतूद करायची म्हणजे नियुक्त व्यक्ती बिनधास्तपणे 'सेवा' करू शकेल.

डिसेंबर २०२४ मध्ये 'निवडणूक संचालन नियम, १९६१' च्या नियम ९३(२) मध्ये दुरुस्ती करून काही निवडणूक दस्तऐवज 'संवेदनशीलसार्वजनिक छाननीसाठी उपलब्ध न ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. मे २०२५ मध्ये निवडणूक आयोगाच्या शिफारसीनुसार केंद्रीय कायदा मंत्रालयाने निवडणूक संचलन नियम १९६१ च्या नियम ९३ (२)(ए) मध्ये आणखी एक बदल केला. ज्यानुसार निवडणुकीचे फोटो आणि व्हिडिओ आता फक्त ४५ दिवसांसाठी उपलब्ध असतील त्यानंतर डिलीट केले जातील. अशा पद्धतीचे नियमबदल आयोगाची पारदर्शकता कमी करतात. या नियम बदलांची वेळ देखील तितकीच महत्वाची आहे. जेव्हा विरोधी पक्ष मतदान केंद्रांच्या फुटेजची मागणी करत होता त्याच वेळी असे बदल केले गेले. त्यामुळे हे बदल निवडणूक प्रक्रियेबद्दलच्या वाढत्या अविश्वासाला आणखीच खतपाणी घालतात.

नंतर येते मतदार याद्यांची विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहीम! 'एसआयआर' सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. ही प्रक्रिया अतिशय क्लिष्ट स्वरूपाची होती. भारतासारख्या देशात जिथे जनता अगोदरच अशा गोष्टींबाबत उदासीन असते तिथे इतकी किचकट प्रक्रिया अतिशय कमी वेळेत राबवणे ही अव्यवहारिक गोष्ट होती. खरे तर प्रक्रिया राबवणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनादेखील व्यवस्थित माहिती नव्हती. निवडणूक आयोगादेखील पूर्ण स्पष्टता नव्हती. त्यामुळे त्यांना वेळोवेळी सूचना जारी कराव्या लागल्या. काही सूचना तर व्हॉट्सॲप मेसेजच्या माध्यमातून देण्यात आल्या.

पहिल्या टप्प्यात बिहारमध्ये 'एसआयआर' राबवण्यात आली, तीही बिहार विधानसभा निवडणुकीच्या ऐन तोंडावर. नंतरच्या दोन टप्प्यांत 'तार्किक विसंगती'च्या आधारावर मतदारांना बाद ठरवण्याची सोय करणारी आणखी एक अन्यायकारक प्रक्रिया समाविष्ट करण्यात आली. या आधारावर कोट्यावधी पात्र मतदारांना विनाकारण सुनावणीला सादर होऊन स्वतःचे नागरिकत्व सिद्ध करावे लागत आहे. त्यामध्ये होणाऱ्या मानसिक, आर्थिक छळाचे काही मोजमापच नाही. पश्चिम बंगालमध्ये तर जवळपास २७ लाख पात्र मतदारांना मतदानापासून वंचित ठेवण्यात आले. देशभरातील जवळपास १३ कोटी नावे मतदार याद्यांमधून वगळण्यात आली. आणि इतर कोट्यवधी पात्र मतदारांचा मताधिकार न्यायिक प्रक्रियेच्या अधिन ठेवण्यात आला आहे. एकंदरीतच या संपूर्ण प्रक्रियेच्या आवश्यकतेपासून ते अमलबजावणी पर्यंत प्रत्येक गोष्टीवर राजकिय विरोधक तसेच सामान्य जनतेच्या मनामध्ये बरेच प्रश्न, शंका- कुशंका आहेत. परंतू निवडणूक आयोगाकडून कधीच समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. याचे दोन अर्थ होतात झ्र एकतर निवडणूक आयोगाकडे उत्तर नाही किंवा त्यांना जाणीवपूर्वक जनतेच्या मनामध्ये निवडणूक आणि मतदानासंदर्भात संभ्रम निर्माण करायचा आहे.

या पार्श्वभूमीवर २३ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या इंडियन एक्सप्रेसच्या शोधपत्रकारिता -वृत्तांमुळे निवडणूक आयोगावर होत असलेल्या सर्व आरोपांना पुष्टीच मिळाली आहे. खुद्द दोन निवडणूक आयुक्तांनी 'एसआयआर'बाबत तसेच आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत उपस्थित केलेले आक्षेप गंभीर स्वरूपाचे होते आणि ते दाबण्यात आले, असे साधार सांगणारी ती बातमी. निवडणूक आयोग घेत असलेल्या निर्णयांची माहिती खुद्द निवडणूक आयुक्तांनाच नव्हती. १० महिन्यांत १४ वेळा पत्र लिहूनही त्यांना उत्तरे भेटली नाहीत. गेल्या ४ महिन्यांत सर्व निवडणूक आयुक्तांची आपापसात बैठकदेखील झालेली नाही.

यातून उघड झालेले महत्त्वाचे मुद्दे म्हणजे नवीन मतदारनोंदणी संदभार्तील फॉर्म ६ मधील बदल, मतदार डेटाबेसचे आयटी विभागाकडे केंद्रीकरण अधिकाऱ्यांच्या (ईआरओ) अधिकारांवर बंधन, पश्चिम बंगालमध्ये मतदार यादीत समाविष्ट केलेल्या १६.१० लाख मतदारांची नावे वगळण्याच्या मागणीसाठी अपील दाखल करण्यात आल्या, त्या अपील अधिकृत कोणी केल्या याचा काही आगापीछाच नसणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे निवडणूक आयोगाची निर्णयपद्धती हे होते.

वरील प्रश्न आजतागायत- म्हणजे महिना झाला तरी- अनुत्तरीतच आहेत. वास्तविक २०२३च्या कायद्यानुसार आयोगाचे निर्णय शक्य तितके सर्वसंमतीनेच घ्यायचे आहेत. मतभेद असल्यास बहुमताने निर्णय घेतला जाऊ शकतो. पण वरील बाबतीत दोन आयुक्तांची मते विरोधी असतानादेखील हे निर्णय आमलात आले कसे? हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. देशाच्या लोकशाहीची जबाबदारी ज्या संस्थेच्या खांद्यावर आहे, त्याच संस्थेमध्ये लोकशाही नाही हे स्पष्टपणे दिसत आहे.

लोकशाही व्यवस्थेमध्ये निवडणूक आयोगासारख्या संस्थेबद्दल जनतेच्या मनात किंचितही संभ्रम राहता कामा नये. कारण एखाद्या गोष्टीवरील विश्वास उडाला तर लोक पर्याय शोधतात, पण लोकशाहीला पर्याय असू शकत नाही. म्हणूनच निवडणूक आयोगाची विश्वासार्हता पुनःप्रस्थापित करण्यासाठी शक्य ती पावले उचलली पाहिजेत. संस्थेच्या विश्वासार्हतेला धक्का पोहोचवणाऱ्या कृतींसाठी जबाबदारी निश्चित झाली पाहिजे आणि दोषी आढळणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई झाली पाहिजे. कारण हा केवळ एका व्यक्तीचा किंवा एका पदाचा प्रश्न नाही; हा लोकशाहीच्या भवितव्याचा प्रश्न आहे.

उद्या कदाचित हा मुद्दादेखील कायद्याच्या चष्म्यातून तपासला जाईल आणि लेखात सुरुवातीला नमूद केलेले इतर मुद्दे तसेच 'एसआयआर' संबंधातील मुद्द्यांप्रमाणे कायदेशीरच ठरवला जाईल. परंतु लोकशाहीचा प्रश्न केवळ 'कायदेशीर आहे की बेकायदा?' एवढ्यापुरता मर्यादित करता येणार नाही. कारण कायद्याच्या चौकटीत राहूनही लोकशाहीच्या मूल्यांना आणि संस्थांच्या स्वायत्ततेला कमकुवत केले जाऊ शकते. एक ज्ञानेश कुमार गेले तरी दुसरे त्याच प्रकारचे मुख्य निवडणूक आयुक्तही नेमले जाऊ शकतात. म्हणूनच लोकशाहीचे रक्षण फक्त न्यायालये, संसद किंवा निवडणूक आयोगासारख्या संस्थांची जबाबदारी नाही. जागरूक, प्रश्न विचारणारे आणि आपल्या अधिकारांबद्दल सजग नागरिक हेच लोकशाहीचे अंतिम संरक्षक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते त्याप्रमाणे, 'सामाजिक जाणीव हीच आपल्या अधिकारांची एकमेव हमी आहे.'

# जागतिक इंटरनेट दिन : इंटरनेटने बदलले जगाचे रूप!



आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. एकेकाळी केवळ संगणक आणि तंत्रज्ञान क्षेत्रापुरते मर्यादित असलेले इंटरनेट आज प्रत्येकाच्या हातातील मोबाइलपर्यंत पोहोचले आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण अनेक कामांसाठी इंटरनेटचा वापर करतो. एखाद्या दिवशी अचानक इंटरनेट बंद पडले किंवा मोबाइलमधील इंटरनेट पॅक संपला, तर आपली किती गैरसोय होते, याची जाणीव आपल्याला होते. यावरून इंटरनेटचे आपल्या जीवनातील महत्त्व लक्षात येते.

इंटरनेटच्या इतिहासात २९ ऑक्टोबर १९६९ हा दिवस अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी अमेरिकेत अफ्फअठएळ या संगणक नेटवर्कच्या माध्यमातून दोन संगणकांदरम्यान पहिला संदेश पाठवण्याचा प्रयत्न करण्यात आला. अमेरिकेच्या संरक्षण विभागाच्या संशोधन प्रकल्पातून या नेटवर्कची निर्मिती झाली होती. त्या काळात अमेरिका आणि रशिया यांच्यात शीतयुद्ध सुरू होते. संशोधकांना दूरवर असलेल्या संगणकांमधील माहितीची देवाणघेवाण करता यावी, हा या प्रयोगामागील प्रमुख उद्देश होता.

कॅलिफोर्निया विद्यापीठातील लॉस एंजेलिस येथील संशोधक चार्ली क्लाइन यांनी स्टॅनफोर्ड रिसर्च इन्स्टिट्यूटमधील संगणकावर 'LOGIN' हा शब्द पाठवण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रणाली बंद पडल्याने सुरुवातीला केवळ 'छड' ही दोन अक्षरेच दुसऱ्या संगणकापर्यंत पोहोचली. हा छोटासा संदेश पुढे जगात माहिती आणि तंत्रज्ञानाची क्रांती घडवणाऱ्या प्रवासातील ऐतिहासिक टप्पा ठरला. १९६९ च्या अखेरीस या नेटवर्कला चार संगणक जोडले गेले होते. पुढे याच तंत्रज्ञानाचा विकास होत आधुनिक इंटरनेटचा विस्तार झाला.

**इंटरनेटमुळे जग जवळ आले!**

गेल्या काही दशकांत इंटरनेटने जगाचे रूप पूर्णपणे बदलून टाकले आहे. पूर्वी एखादा संदेश दुसऱ्या शहरात किंवा परदेशात पाठवण्यासाठी बराच वेळ लागत असे. आज व्हॉट्सॲप, ई-मेल, व्हिडिओ कॉल आणि समाजमाध्यमांच्या माध्यमातून जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील व्यक्तीशी काही क्षणांत संपर्क साधता येतो. अंतराची बंधने कमी झाली असून संवाद अधिक जलद आणि सुलभ झाला आहे.

शिक्षण क्षेत्रात इंटरनेटमुळे मोठी क्रांती झाली आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइन व्याख्याने, डिजिटल पुस्तके, शैक्षणिक व्हिडिओ आणि विविध अभ्याससाहित्य सहज उपलब्ध होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही घरबसल्या दर्जेदार शैक्षणिक माहिती मिळवण्याची संधी निर्माण झाली आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी, ऑनलाइन अभ्यासक्रम आणि दूरस्थ शिक्षण यामुळे ज्ञानाची दारे अधिक व्यापक झाली आहेत.

आरोग्य क्षेत्रातही इंटरनेट उपयुक्त ठरत आहे. ऑनलाइन डॉक्टरांचा सल्ला, दूरस्थ वैद्यकीय सेवा, तपासणी अहवाल मिळवणे आणि रुग्णांच्या वैद्यकीय नोंदी जतन करणे यांसारख्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. विशेषतः दुर्गम भागातील रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांशी संपर्क साधणे सोपे झाले आहे.

व्यापार आणि बँकिंग क्षेत्रात इंटरनेटमुळे आमूलाग्र बदल झाले आहेत. ऑनलाइन खरेदी-विक्री, डिजिटल बँकिंग, यूपीआयद्वारे पैशांचे व्यवहार, वीजबिल भरणे, तिकीट आरक्षण आणि विविध सरकारी सेवांचा लाभ घेणे घरबसल्या शक्य झाले आहे. त्यामुळे वेळ, श्रम आणि प्रवासाचा खर्च वाचतो. अनेकांना ऑनलाइन व्यवसाय, घरबसल्या काम आणि रोजगाराच्या नव्या संधीही उपलब्ध झाल्या आहेत.

शेती क्षेत्रातही इंटरनेटचे महत्त्व वाढले आहे. शेतकऱ्यांना हवामानाचा अंदाज, बाजारभाव, आधुनिक शेतीतंत्र, पीक व्यवस्थापन आणि सरकारी योजनांची माहिती मिळू शकते. त्यामुळे योग्य निर्णय घेण्यास मदत होते. मनोरंजन, पर्यटन, पत्रकारिता आणि संशोधन या क्षेत्रांमध्येही इंटरनेटने मोठे बदल घडवले आहेत.

भारतामध्ये १९९५ मध्ये सार्वजनिक इंटरनेट सेवा सुरू झाली. त्यानंतर मोबाइल इंटरनेट आणि स्वस्त डेटा सेवांच्या विस्तारामुळे इंटरनेटचा वापर झपाट्याने वाढला. भारतात २०१४ मध्ये सुमारे २५.१५ कोटी इंटरनेट जोडण्या होत्या; २०२५ मध्ये ही संख्या १०० कोटींपेक्षा अधिक झाली. यावरून देशातील डिजिटल क्रांतीचा वेग लक्षात येतो.

**इंटरनेटचा वापर विवेकाने करणे आवश्यक!**

इंटरनेटचे अनेक फायदे असले, तरी त्याच्या अतिवापरामुळे काही समस्या निर्माण होत आहेत. समाजमाध्यमांचे व्यसन, चुकीच्या माहितीचा प्रसार, ऑनलाइन फसवणूक, सायबर गुन्हे, वैयक्तिक माहितीची चोरी आणि मुलांच्या स्क्रीन टाइममध्ये होणारी वाढ या गंभीर समस्या आहेत. त्यामुळे इंटरनेट वापरताना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. अनोळखी लिंकवर क्लिक करणे टाळावे, पासवर्ड सुरक्षित ठेवावेत, ओटीपी कोणालाही सांगू नये आणि माहितीची सत्यता तपासूनच ती पुढे पाठवावी.

इंटरनेट हे ज्ञान, संवाद आणि विकासाचे प्रभावी साधन आहे. त्याचा योग्य वापर केल्यास वैयक्तिक प्रगतीपासून देशाच्या आर्थिक विकासापर्यंत अनेक फायदे मिळू शकतात. मात्र, तंत्रज्ञानाचा वापर माणसाच्या प्रगतीसाठी व्हावा, माणसाने तंत्रज्ञानाच्या आहारी जाऊ नये. इंटरनेटने जग जवळ आणले आहे; आता या तंत्रज्ञानाचा वापर अधिक सुरक्षित, जबाबदार आणि विधायक पद्धतीने करणे ही काळाची गरज आहे.



**श्याम ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे

# शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत गुणात्मक परिवर्तनासाठी सर्वेक्षणाची मदत होईल – मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** शासकीय योजनांची व्याप्ती वाढविणे, अधिकाधिक नागरिकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविणे आणि त्यांच्या अंमलबजावणीतील परिणामकारकता तपासणे महत्वाचे असल्याने यासाठी सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. सर्वेक्षणाच्या माध्यमातून शासकीय योजनाच्या प्रभावी अंमलबजावणी बरोबरच त्यामध्ये गुणात्मक परिवर्तन होण्यास मदत होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

माहिती व जनसंपर्क विभागामार्फत नियुक्त ॲक्सिस माय इंडिया या संस्थेमार्फत विविध विभागांच्या योजनांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. यासंदर्भात सह्याद्री अतिथिगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना आणि योजना पश्चात सर्वेक्षणाबाबत बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विविध शासकीय विभागांच्या सहकार्याने योजनांच्या सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. योजनांच्या कार्यप्रणालीचा अभ्यास, लाभार्थ्यांच्या माहितीचे विश्लेषण, योजनांमुळे साध्य झालेल्या परिणामांचे मूल्यमापन आणि त्यातून पुढील सुधारणांसाठी आवश्यक बाबी निश्चित करणे, अशा विविध स्तरांवर काम केले जात आहे. राज्यातल्या अधिकाधिक नागरिकांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी या सर्वेक्षणांचा चांगला उपयोग होऊ शकतो. योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात सर्वेक्षणातून मिळणारी माहिती केवळ माहितीपुरती मर्यादित न ठेवता, त्यातून प्रत्यक्ष कामकाजात सुधारणा घडवून आणण्यास मदत होईल. उपलब्ध माहितीच्या आधारे योजनांची सद्य:स्थिती समजून घेणे, लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात येणाऱ्या अडचणी ओळखणे आणि अपेक्षित परिणाम साध्य करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे शक्य होणार आहे. त्यासाठी संबंधित विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांनी आवश्यक सहकार्य करावे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या सर्वेक्षणाच्या माध्यमातून योजनांबद्दलची अचूक माहिती मिळण्यास मदत होईल तसेच शासनाच्या योजनांसाठी असणारा प्रतिसाद समजण्यास मदत होईल. या सर्वेक्षणाच्या माध्यमातून अचूक डेटा बेस तयार होईल आणि लोकांना शासकीय योजनांचा अधिक लाभ मिळण्यास मदत होईल. या सर्वेक्षणातून शासकीय योजनांबाबत अधिक विश्वासार्हता निर्माण होऊन राज्य शासनास अचूक माहिती मिळेल आणि गुणात्मक परिवर्तन होण्यास मदत होईल.

**क्षेत्रीय कार्यालयांचा सहभाग महत्वाचा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, योजनांची व्याप्ती वाढविण्यासाठी आणि त्यांची अंमलबजावणी अधिक सुलभ करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांची भूमिका महत्वाची आहे. प्रत्यक्ष क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी आवश्यक सहकार्य करून माहिती संकलन व विश्लेषणाच्या प्रक्रियेत समन्वय साधावा आणि योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पूरक वातावरण निर्माण करावे.

शासकीय यंत्रणा आणि संबंधित संस्थेने एकसंघ भावनेतून काम केल्यास योजनांच्या अंमलबजावणीत अधिक चांगले परिणाम साधता येतील. उपलब्ध माहितीचा योग्य वापर, समन्वयपूर्ण कार्यपद्धती आणि प्रत्यक्ष क्षेत्रातील अनुभव यांच्या आधारे प्रशासकीय कामकाजात सुधारणा घडवून आणता येईल. या माध्यमातून शासनाच्या विविध योजना अधिक परिणामकारक होण्यासह नागरिकांपर्यंत त्यांचा लाभ पोहोचविण्याच्या प्रक्रियेत गुणात्मक परिवर्तन घडविणे शक्य होईल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

बैठकीस राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव उपस्थित होते. तर विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह जिल्हास्तरीय अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

पान १ वरून

## चार आमदारांचे मामा....

राजकीय घडामोडींबरोबरच नेत्यांचे कौटुंबिक संबंध, राजकीय समीकरणे आणि प्रभाव यांची चर्चा सोशल मीडियावर नेहमीच होत असते. त्यातच 'चार आमदारांचे मामा अनगरचे राजन पाटील' हा उल्लेख लक्षवेधी ठरत आहे. राजन पाटील यांच्या राजकीय कारकिर्दीबरोबरच त्यांच्या कुटुंबीयांचे सहकार आणि सार्वजनिक जीवनातील योगदान यामुळे अनगरचे नाव पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

एकीकडे सहकार क्षेत्रातील नेतृत्व, तर दुसरीकडे चार आमदारांशी असलेल्या मामाच्या नात्याची चर्चा, अशा दुहेरी कारणांमुळे अनगरचे राजन पाटील सध्या राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी असल्याचे चित्र सोशल मीडियावरील प्रतिक्रियांमधून दिसत आहे.

## पुणे पदवीधर मतदारसंघात...

पुणे पदवीधर आणि पुणे शिक्षक हे दोन्ही मतदारसंघ भाजपसाठी महत्त्वाचे मानले जातात. या दोन्ही जागांवर विजय मिळेल, असा विश्वास भाजपकडून व्यक्त करण्यात आला होता. मात्र, निकालानंतर वेगळे चित्र समोर आले. पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपला विजय मिळाला, तर पदवीधर मतदारसंघात पक्षाच्या उमेदवाराला पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे एका मतदारसंघातील विजय आणि दुसऱ्या मतदारसंघातील पराभव अशी स्थिती निर्माण झाली.

## शिक्षक मतदारसंघातील...

कार्यकर्त्यांनी केलेले प्रयत्न यामुळे या मतदारसंघात सर्वात तरुण आमदार म्हणून कौस्तुभ गावडे हे विजयी झाले आहेत. पण तत्पूर्वी त्यांचा मार्ग अडथळ्यांनी भरलेला होता.

**नवी आव्हाने**

असे असले तरी कौस्तुभ गावडे यांच्या रूपाने या मतदारसंघाची आमदारकी मात्र पुन्हा कोल्हापुरातच राहिली आहे. ही जिल्ह्याच्या दृष्टीने समाधानाची बाब ठरली आहे. शिक्षण क्षेत्रात शिक्षक, विद्यार्थी, पालक, शिक्षण संस्था, समाजाच्या भावना अशा अनेक प्रश्नांचे मोहोळ उभे आहे. त्याला भिडून ते प्रश्न राज्य शासनाकडून सोडवण्याचे आव्हान युवा आमदार कौस्तुभ गावडे यांच्यासमोर असणार आहे.

# दुष्काळग्रस्त तालुक्यांत जलसंधारण; प्रत्येक गावात १०० जलशोषक खड्डे; नाले करणार खोल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात सन २०२६ च्या खरीप हंगामात ट्रिगर-१ (प्रथम कळ) आणि ट्रिगर-२ (दुसरी कळ) लागू झालेल्या ३०४ तालुक्यांमध्ये मृद व जलसंधारणाची विविध कामे हाती घेण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत.

दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंधारणाच्या कामांना गती देण्यासह अपूर्ण कामे पूर्ण करणे, नादुरुस्त बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे, गावांतील जलसाठ्यांमधील गाळ काढणे आणि नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या प्रत्येक तालुक्यातील गावांमध्ये किमान १०० जलशोषक खड्डे तयार करण्याचे निर्देशही शासनाकडून देण्यात आले आहेत. मृद व जलसंधारण विभागाच्या योजनांमधील प्रगतिपथावरील आणि अपूर्ण कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. जलसंधारणाच्या संरचनांची दुरुस्ती, सर्व



बंधाऱ्यांवर गेट अथवा फळ्या बसवून पाणी अडविणे आणि त्याची वेळोवेळी पाहणी करणे, नादुरुस्त कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांची दुरुस्ती करून नीडल बसविणे.

तसेच गावांतील जलसाठ्यांमधील गाळ काढणे यांचा यात समावेश आहे. याशिवाय, नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण, निराई बंधारे तयार करणे, नाला खोलीकरणाच्या ठिकाणी तसेच बंधारे आणि तलावांमध्ये रिचार्ज शाफ्ट घेणे आणि शासकीय व खासगी इमारतींवर रेनवॉटर हार्वेस्टिंगच्या संरचना उभारणे, अशी कामे करण्यात येणार आहेत. स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून होणाऱ्या मृद व जलसंधारणाच्या कामांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचेही निर्देश दिले आहेत.

विविध निधींचा वापर करणार या कामांसाठी जलयुक्त शिवार अभियान २.०, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.०, जिल्हा नियोजन समितीचा निधी, विशेष घटक योजना, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती उपयोजना, तांडा विकास योजना, नावीन्यपूर्ण योजना आणि जनसुविधांसाठीच्या विशेष अनुदानाचा वापर करता येणार आहे. यासोबतच खनिज विकास निधी, खासदार निधी, आमदार व विधान परिषद सदस्य निधी, कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर), रोजगार हमी योजना आणि व्हीबी जी राम जी योजनेतील निधी तसेच अन्य उपलब्ध शासकीय निधी स्रोतांतून ही कामे करण्याचे निर्देश आहेत.

# सोलापूरात बोगस मॅट्रिमोनी रॅकेट उद्ध्वस्त
## विजापूर नाका पोलिसांची धडक कारवाई

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लग्न जुळवण्याच्या बहाण्याने फसवणूक करणाऱ्या एका आंतरजिल्हा बोगस मॅट्रिमोनी रॅकेटचा विजापूर नाका पोलिसांनी पदार्फाश केला आहे. पुणे, जालना आणि सोलापूर जिल्ह्यातून पोलिसांनी या गुन्ह्यातील ६ जणांना अटक केली असून, त्यांच्याकडून गुन्ह्याशी संबंधित मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दिनांक १८ ऑगस्ट २०२६ ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आरोपींनी कट रचून फियार्दी सुरज संजय पवार (वय ३१, रा. गुरुदत्त नगर, सैलफुल, विजापूर रोड, सोलापूर) यांना विवाह करून देण्याचे आश्वासन दिले.

एजंट ज्योती लोंढे, सचिन शिंदे, योगिता सूर्यवंशी, सुनिता दाभाडे, दत्तात्रय सूर्यवंशी आणि कैलास शिंदे यांनी फियार्दीकडून विविध कारणांसाठी वेळोवेळी एजंट फी म्हणून २,१७,५०० रुपये उकळले.

यानंतर योगिता हिचा विवाह फियार्दीशी लावून देण्यात आला. विवाहानंतर योगिता फियार्दीच्या घरी राहण्यास आल्यावर तिने वेगवेगळ्या अटी व कारणे सांगून घरातून लांब राहणे पसंद केले आणि फियार्दीच्या घरातील रोख रक्कम तसेच दागिन्यांची माहिती मिळवली.

## वात्रटिका

### मशिन आणि बॅलेट

मशीन म्हणाली बॅलेटला
तुझ्यामुळे बदनामी झाली...
उरली सुरली होती ती सुद्धा
तुझ्यामुळेच तर गेली...
खूप झाले तुझे आता, तू
फार दिवस तोरा मिरवला...
बॅलेट म्हणाला चिडून थोडा
बंद होणार तुझा बोलबाला...

**हणमंत पडवळ**
धाराशिव
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.

Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# कौस्तुभ गावडे यांच्या विजयाचा भाजपकडून साधेपणाने आनंद साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे शिक्षक मतदारसंघातून कौस्तुभ मुरलीधर गावडे यांनी विजय मिळविल्याबद्दल सोलापूर शहर भारतीय जनता पक्षाच्या वतीने आनंद व्यक्त करण्यात आला. राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीचे भान राखत कोणताही जल्लोष न करता साधेपणाने विजय साजरा करण्यात आला. यावेळी कैलासवासी प. पू. डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

शिक्षक मतदारसंघातील या विजयाबद्दल शिक्षक बांधव आणि भाजप पदाधिकाऱ्यांनी बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यास पुष्पार्पण केले. सध्याची दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन विजयाचा आनंद साधेपणाने व्यक्त करण्याचा निर्णय पक्षाच्या वतीने घेण्यात आला होता. त्यानुसार फटाके, मिरवणूक किंवा मोठा जल्लोष न करता अभिवादनातून आनंद व्यक्त करण्यात आला.

या प्रसंगी सोलापूर शहर भाजपच्या अध्यक्ष रोहिणीताई तडवळकर, स्थायी समितीच्या सभापती रंजिता चाकोते, शहर जिल्हा सरचिटणीस सुधाताई अळ्ळीमोरे, नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल, सागर अतनूरे, शहर प्रचारप्रमुख व्यंकट राठोड, विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. एस. कदम, दक्षिण सोलापूर तालुकाप्रमुख श्रेयस पाटील, क्रीडा शिक्षक संतोष राठोड यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# उमेश पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय मुख्य प्रवक्तेपदी नियुक्ती



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय मुख्य प्रवक्तेपदी उमेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते आणि खासदार पार्थ पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथील देवगिरी निवासस्थानी ही नियुक्ती करण्यात आली. यावेळी सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांनी उमेश पाटील यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

उमेश पाटील यांनी यापूर्वी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तसेच सरचिटणीस म्हणून पक्षसंघटनेत काम केले आहे. सोलापूर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष म्हणून ही ते कार्यरत आहे. गत वेळी जिल्हा परिषद सदस्य असताना त्यांनी उल्लेखनीय काम केले होते. दिवंगत अजित पवार यांचे विश्वासू सहकारी म्हणून त्यांची ओळख होती. पक्षाच्या संघटनात्मक आणि राजकीय कार्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

मोहोळ विधानसभा मतदारसंघातील उमेदवारीच्या निवडीवरून झालेल्या राजकीय संघर्षाच्या पार्श्वभूमीवर उमेश पाटील यांनी यापूर्वी मुख्य प्रवक्तेपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे उमेदवार राजू खरे यांना पाठिंबा दिला होता. या घडामोडींमुळे मोहोळच्या राजकीय वतुर्ळात त्यांची भूमिका चचेर्चा विषय ठरली होती.

**माझ्या या नव्या जबाबदारीचे श्रेय मी अजितदादा पवार चरणी अर्पण करतो**

स्वर्गीय अजित पवार आणि पक्षासोबत काम करताना अनेक चढ–उतार पाहिले; पण प्रत्येक कठीण प्रसंगी दादा माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. त्यांचा विश्वास, मार्गदर्शन आणि दिलेली शिकवण हीच माझी खरी ताकद राहिली आहे. आज दादा आमच्यात नाहीत, ही वेदना कायम मनात राहील. पण त्यांनी दिलेले विचार, मूल्ये आणि जनसेवेचा मार्ग माझ्या प्रत्येक कार्यातून जिवंत ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी आयुष्यभर करत राहीन. दादांनी दाखवलेल्या मार्गावर चालणे, हीच त्यांच्या प्रती माझी खरी कृतज्ञता असेल. आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय मुख्य प्रवक्तेपदी झालेली माझी नियुक्ती मी स्वर्गीय अजित दादा पवार यांना समर्पित करतो.

**–उमेश पाटील,** नूतन राष्ट्रीय प्रवक्ते, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

# सोलापूर मनपाची थकबाकीदारांवर कारवाई

## होटगी रोड, कुंभार वेसमधील ६ व्यापारी गाळे सील

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या भूमी व मालमत्ता कर विभागाने थकबाकीदारांविरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे. वारंवार संधी देऊन आणि रितसर नोटिसा बजावूनही थकीत भाड्याची रक्कम न भरल्याने होटगी रोड आणि कुंभार वेस परिसरातील सहा व्यापारी गाळे सील करण्यात आले. मनपाच्या या कारवाईमुळे थकबाकीदार गाळेधारकांमध्ये खळबळ उडाली आहे.

महानगरपालिकेच्या अभय योजना २०२६–२७ अंतर्गत थकबाकी वसुलीची मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान खुल्या जागांचे भाडेधारक आणि व्यापारी गाळेधारकांना थकीत रक्कम भरण्यासाठी संधी देण्यात आली होती. मात्र, नोटिसा देऊनही प्रतिसाद न मिळाल्याने प्रशासनाने थेट जप्तीची कारवाई करत संबंधित गाळ्यांना सील ठोकले. या कारवाईची माहिती महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

**होटगी रोडवरील पाच, कुंभार वेसमधील एक गाळा सील**

मनपा पथकाने केलेल्या कारवाईत कुंभार वेस येथील संतोष



सुभाषचंद्र निरंकारी यांच्या गाळ्यावर ३७ हजार ७३४ रुपयांची थकबाकी असल्याने तो सील करण्यात आला. तसेच होटगी रोड परिसरातील वसंत फडके (२०,८०२ रुपये), वर्षा नितीन मस्के (२९,५४९ रुपये), रियाझ रमजानसाब शेख (२०,२३० रुपये), मच्छिंद्र दामोदर चौगुले (१७,२१४ रुपये) आणि पंकज व्हनकळस (१७,२७६ रुपये) यांच्या गाळ्यांवरही कारवाई करण्यात आली.

या सहा गाळेधारकांकडील एकूण थकबाकी १ लाख ४२ हजार ८०५ रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

**रक्कम भरताच काही गाळे सीलमुक्त**

महानगरपालिकेने गाळे सील करण्याची कारवाई सुरू करताच काही मिळकतधारकांनी थकीत भाड्याची संपूर्ण रक्कम तातडीने जमा केली. संबंधित थकबाकी वसूल झाल्यानंतर प्रशासनाने या गाळ्यांचे सील काढून ते सीलमुक्त केले. त्यामुळे थकबाकी वसुलीसाठी मनपाने केलेल्या कारवाईचा परिणाम दिसून आला.

**थकबाकी भरा, अभय योजनेचा लाभ घ्या!**

थकीत भाडे असलेल्या सर्व गाळेधारकांनी आणि खुल्या जागा भाडेतत्त्वावर घेतलेल्या मिळकतधारकांनी थकीत रकमेचा तातडीने भरणा करावा, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी केले आहे. अभय योजना २०२६–२७ चा लाभ घेऊन संभाव्य जप्ती व सील करण्यासारखी कारवाई टाळावी, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

थकबाकी वसुलीसाठी आगामी काळातही मोहीम सुरू राहणार असल्याने संबंधित मिळकतधारकांनी दुर्लक्ष न करता थकीत रक्कम भरावी, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# ज्येष्ठ पत्रकार प्रताप आसबे यांचे निधन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरचे भूमीपुत्र ,ज्येष्ठ पत्रकार आणि राजकीय विश्लेषक प्रताप आसबे (वय ७६) यांचे बुधवारी मुंबईत निधन झाले.त्यांच्या मागे पत्नी कमल व दोन मुले असा परिवार आहे. नॅशनल पेमेंट्स कार्पोरेशनचे व्यवस्थापकीस संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप आसबे हे त्यांचे पुत्र होत. त्यांचे पार्थिव उद्या सकाळी साडेआठ वाजता त्यांच्या वांद्रे पूर्व येथील घरी नेण्यात येणार असून त्यानंतर शिवाजी पार्क स्मशानभूमीत साडेअकराच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

प्रताप आसबे यांचा जन्म सोलापूर जिल्ह्यात झाला होता. शिवाजी विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी संपादन केल्यानंतर ते युवक चळवळीकडे ओढले गेले. कॅपिटेशन फी विरोधातील आंदोलन, राशीनमधील शेतमजूरांसाठी राशीन कम्युनचा प्रयोग, त्यानंतर तत्कालिन मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर आंदोलन व मुंबईतील गिरणी कामगारांचे आंदोलन याच्यामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला. याच काळात त्यांना काही काळ तुरूंगवासही भोगावा लागला. त्यानंतर आसबे यांनी पूर्णवेळ पत्रकारिता केली. प्रारंभी नवशक्ती व त्यानंतर महाराष्ट्र टाइम्समध्ये त्यांनी काम केले. महाराष्ट्र टाइम्समधील त्यांचा " महाराष्ट्र देशी " हा स्तंभ वाचकांच्या विशेष पसंतीस उतरला. निवृत्तीनंतर काही वृत्तवाहिन्यांवरही त्यांनी राजकीय विश्लेषकाची भूमिका बजावली.

**अभ्यासू आणि अनुभवी व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड**

ज्येष्ठ पत्रकार आणि राजकीय विश्लेषक प्रताप आसबे यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पत्रकारिता क्षेत्रातील अभ्यासू, अनुभवी आणि राजकीय–सामाजिक घडामोडींचे सखोल विश्लेषण करणारे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. राजकारण, समाजकारण आणि अर्थकारण या विषयांवरील त्यांचे लेखन व विश्लेषण ही त्यांच्या पत्रकारितेची प्रमुख वैशिष्ट्ये होती. त्यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली अर्पण केली. पत्रकारितेत राजकीय घडामोडींचे वृत्तांकन करताना घटनांची तात्कालिकता महत्त्वाची असते; मात्र त्या घटनांचा दीर्घकालीन परिणाम समजून घेणेही तितकेच आवश्यक असते. प्रताप आसबे यांच्या लेखनातून हा व्यापक दृष्टिकोन दिसून येत असे. महाराष्ट्रातील सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाचा अभ्यास करताना त्यांनी विविध घडामोडींमधील परस्परसंबंध समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. राजकारण हे केवळ सत्तेचे गणित नसून त्याचा सामान्य नागरिकांच्या जीवनावरही परिणाम होत असतो, ही भूमिका त्यांच्या विश्लेषणातून ठळकपणे समोर येत असे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक घडामोडींच्या सखोल अभ्यासाचा गौरव केला.प्रताप आसबे यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पत्रकारिता क्षेत्रातील एका अनुभवी अभ्यासकाला गमावले आहे. अनेक वर्षांच्या अनुभवातून विकसित झालेली त्यांची राजकीय समज, घडामोडींचा मागोवा घेण्याची पद्धत आणि लेखनातून व्यापक संदर्भ मांडण्याची हातोटी ही त्यांच्या कार्याची महत्त्वाची ओळख होती. त्यांच्या निधनामुळे आसबे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोक व्यक्त करताना त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असल्याचे म्हटले आणि त्यांना या आघातातून सावरण्याचे बळ मिळावे, अशी प्रार्थना केली.

**तीन दशकांहून अधिक काळ पत्रकारितेचा अनुभव**

प्रताप आसबे हे तीन दशकांहून अधिक काळ पत्रकारितेत कार्यरत असलेले ज्येष्ठ पत्रकार होते. महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक घडामोडींकडे केवळ दैनंदिन बातम्या म्हणून न पाहता, त्या घडामोडींचे व्यापक परिणाम समजून घेण्याची त्यांची दृष्टी होती. देशाच्या राजकारणातील बदल, राजकीय पक्षांची वाटचाल, सामाजिक संघर्ष, आर्थिक धोरणे आणि लोकशाही प्रक्रियेतील घडामोडी यांचा ते सातत्याने अभ्यास करीत असत.

त्यांच्या लेखनातून राजकीय घटनांच्या पाठीमागील संदर्भ, त्यातून निर्माण होणारे प्रश्न आणि समाजजीवनावर होणारे परिणाम समजून घेण्याचा प्रयत्न दिसून येत असे. त्यामुळे त्यांची ओळख केवळ वृत्तसंकलन करणारे पत्रकार म्हणून नव्हे, तर घडामोडींचा अर्थ उलगडून सांगणारे राजकीय विश्लेषक म्हणूनही निर्माण झाली होती.

# अर्जित रजेच्या रोखीकरणाची रक्कम अदा करा – महापौर कोंड्याल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिका कर्मचाऱ्यांच्या अर्जित रजेच्या रोखीकरणाची रक्कम प्रतीक्षा यादीप्रमाणे अदा करण्याची कार्यवाही करा, असे आदेश महापौर विनायक कोंड्याल यांनी प्रशासनाला दिले आहेत. त्याचबरोबर कर्मचाऱ्यांच्या सानुग्रह अनुदानात 900 रुपयांची वाढ करून 4500 देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबद्दल कामगार संघटनांनी महापौर विनायक कोंड्याल यांचे आभार मानले. या निर्णयामुळे महापालिका कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे निर्माण झाले आहे.

महापौर कोंड्याल यांनी बुधवारी सायंकाळी कामगार संघटना कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन चर्चा केली. यावेळी महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरीताई देवकर, सभागृह नेते नरेंद्रजी काळे, स्थायी समिती सभापती रंजीताताई चाकोते, मुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर, नगर सचिव प्रवीण दंतकाळे यांच्यासह कामगार नेते अशोक जानराव, शेषराव शिरसाट आणि कामगार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. विविध कामगार संघटनांनीही अनुदानवाढीसाठी निवेदने दिली होती. या मागण्यांचा विचार करून सानुग्रह अनुदानात वाढ करण्याचा निर्णय महापौर विनायक कोंड्याल यांनी घेतला. सानुग्रह अनुदान ४५०० रुपये आणि सणासाठी दिले जाणारे १२ हजार ५०० रुपयांचे अग्रिम (सन ॲडव्हान्स) मात्र कायम ठेवण्यात आले आहे.

दिवाळी ५ नोव्हेंबरपासून सुरू होत असल्याने २ नोव्हेंबरपर्यंत कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात वेतन, अनुदान आणि अग्रिम जमा करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले. यासाठी शनिवार आणि रविवारच्या सुट्टीच्या दिवशीही संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यालयात उपस्थित राहून देयकांची तपासणी करावी, असे निर्देश दिले आहेत. मार्च २०२६ मधील प्रतीक्षा यादीप्रमाणे अर्जित रजेच्या रोखीकरणाची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी असे आदेश महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले.

महापालिका कामगार संघटना कृती समितीचे अध्यक्ष कामगार नेते अशोक जानराव, शेषराव शिरसाट यांच्यासह विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी महापौरांचे आभार मानले.

# श्री भगवती गौरीमाता प्रशालेत आकाशकंदील व ग्रीटिंग कार्ड निर्मिती उपक्रम उत्साहात



**धोत्री (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील श्री भगवती गौरीमाता प्रशालेत दिवाळीच्या निमित्ताने आकाशकंदील व ग्रीटिंग कार्ड बनविण्याचा उपक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील सर्जनशीलता विकसित व्हावी आणि हस्तकलेची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आकाशकंदील निर्मिती स्पर्धेत लहान व मोठ्या गटांतील एकूण १५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, तर ग्रीटिंग कार्ड निर्मिती स्पर्धेत ३९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी विविध रंग, आकर्षक सजावट आणि कल्पकतेचा वापर करून सुंदर आकाशकंदील व ग्रीटिंग कार्ड तयार केली.

या स्पर्धा मुख्याध्यापक गिरमल बुगडे, पर्यवेक्षक परमेश्वर मेरु व संजय पाटू यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आल्या. परीक्षक म्हणून चंद्रकांत स्वामी व मल्लिकार्जुन गुरव यांनी काम पाहिले.

**आकाशकंदील निर्मिती स्पर्धेचा निकाल**

**लहान गट :**
प्रथम : श्रुती स्वामी
द्वितीय : आदित्य दहिटणे
तृतीय : शाश्वत पाटील
उत्तेजनार्थ : श्रेयश तोळणूर व संकेत चौगुले

**मोठा गट :**
प्रथम : विजय शिरसेडकर
द्वितीय : अजय शिरसेडकर व नागराज बिराजदार
तृतीय : आकाश डमढेरे
उत्तेजनार्थ : भीमाशंकर चौगुले

**ग्रीटिंग कार्ड निर्मिती स्पर्धेचा निकाल**
प्रथम : मीनाक्षी सावंत्रे
द्वितीय : सृष्टी कोळी
तृतीय : वैष्णवी चौगुले
उत्तेजनार्थ : स्नेहा मठ

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्वतःच्या कल्पकतेतून आकर्षक कलाकृती साकारण्याची संधी मिळाली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळून त्यांच्यात आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि स्वनिर्मितीचा आनंद मिळाल्याचे मुख्याध्यापक बुगडे यांनी सांगितले.

**आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**
**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**
**संपर्क - 9422602337, 8317212037**

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल
**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल–सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
### अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर–वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर–वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु–वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) महाराष्ट्राचे एक उपमुख्यमंत्री २) कविता, काव्य ३) खोदलेले खंदक ४) कमजोर ५) भारतीय क्रिकेट संघाचा एक माजी कर्णधार ६) व्रण, ओळ (ग्रामीण भाषेत) ११) दुर्दशा, वाईट स्थिती, **अपेष्टा १२) उणीव, टंचाई १३) उजाड, ओसाड १५) काकाची पत्नी १७) कष्ट, परिश्रम १९) वतनाचा मालक २०) शिक्षा २२) एक म्हण-उथळ पाण्याला खळखळाट **२४) महाराष्ट्राचा पूर्व-दक्षिण जिल्ह्यांचा भाग २५) दोन मिनिटात तयार होणारी, लहान मुलांच्या आवडीचा पदार्थ ज्याच्यावर सरकारने बंदी आणली होती २७) दुःख (हिंदीत) २९) मराठी वर्षातील अकरावा महिना ३०) विक्रम गोखले, दिलीप प्रभावळकर अभिनीत राजकारणावरील चित्रपट ३१) विदेशी मद्य ३२) श्रीकृष्णाचा भाऊ ३३) बोलावणे, हाक ३७) लोकसभा सदस्य ३९) राष्ट्रवादीचे एक नेते-छगन **** ४२) संशय हिंदीत) ४३) जपानी जाड पैलवान ४५) विषमच्या विरूध्दार्थी ४७) होता जिवा म्हणून वाचला ** ४८) फटाक्याची माळ, शिक्षकांना या नावाने संबोधतात

**आडवे शब्द :** १) काँग्रेस पक्षाचे एक नेते ४) आ. नितेश राणे यांचा मतदारसंघ ७) नवरा मुलगा, आशिर्वाद ८) सीतापती ९) एक म्हण-सुंभ जळाला तरी ** जळत नाही १०) पाणी पिण्याची तीव्र इच्छा, तृष्णा १२) भवा उलट लिहा १४) आयपीएलमधील एक अष्टपैलू खेळाडू-*** पंड्या १६) क्षण (हिंदीत) १७) स्वर्गातील एक अप्सरा १८) श्रीकृष्णाची आई २०) संगत, सोबत २१) दोघांमधील अंतर, फरक २३) मुस्लिम बांधवांचा एक पवित्र सण २६) गन उलट लिहा २८) तमाशातील कलावंत ३२) सुक्या मेव्यातील एक पौष्टीक घटक ३३) बारा गुणिले पाच ३४) वास्तू, निवास ३५) थंडीमध्ये गळ्याभोवती गुंडाळतात ३६) रूग्णालय ३८) चुलत्यांना वा मावशीच्या पतीस या नावाने संबोधतात ४०) मच्छर ४१) बे दुणे ४२) लाज ४४) गुलाम ४६) समीर भुजबळ या जिल्ह्यातील आहेत ४८) सर्व (हिंदीत) ४९) मुस्लिम बांधवांचा एक सण ५०) गुटख्याप्रमाणे एक अंमली पदार्थ ५१) भारतातील दक्षिणेकडील एक राज्य

## सुडोकु - 87

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | | | 4 | | 8 | | |
| | | 3 | | | 1 | | 5 | |
| 8 | | 1 | 7 | | 6 | 3 | 4 | 9 |
| | | 5 | | | 9 | 1 | | 2 |
| 2 | 1 | | | | 8 | | 6 | 4 |
| | | | | 6 | | 5 | | |
| 5 | 6 | | 9 | 1 | 3 | 4 | | |
| | 4 | 2 | 6 | | | | 1 | |
| 1 | | 7 | | | | 6 | | 3 |

# आ. अभिजीत पाटील यांच्या पाठपुराव्याला मोठे यश !

## KEM हॉस्पिटलला रुग्णाचे ₹१०.२५ लाख परत करण्याचे आदेश

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** धर्मादाय योजनेअंतर्गत उपचारांचा लाभ न मिळाल्याने ड्एट हॉस्पिटल, पुणे येथे उपचारासाठी १० लाख २५ हजार रुपये भरावे लागलेल्या सौ. अश्विनी सोमनाथ पाटील यांना दिलासा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेच्या अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित करून रुग्णांच्या हक्कांसाठी आवाज उठवला. तसेच, पुणे विभागाचे धर्मादाय सहआयुक्त यांच्याकडे लेखी तक्रार करून संबंधित रुग्णालयाविरोधात कारवाईची मागणी केली. आमदार अभिजीत पाटील यांच्या या पाठपुराव्याला यश आले असून, धर्मादाय सहआयुक्त तथा देखरेख समितीने KEM हॉस्पिटलला संबंधित रुग्णाच्या नातेवाइकांना १० लाख २५ हजार रुपये १५ दिवसांच्या आत परत करण्याचे निर्देश दिले आहेत. हा आदेश ७ ऑक्टोबर २०२६ रोजी पारित करण्यात आला आहे.

**विधानसभेच्या अधिवेशनात आमदार अभिजीत पाटील यांनी मांडला रुग्णांच्या हक्कांचा प्रश्न!**

धर्मादाय योजनेअंतर्गत पात्र रुग्णांना उपचारांचा लाभ मिळणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात रुग्णांना लाखो रुपयांचा खर्च करावा लागत असल्याचा गंभीर मुद्दा आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेच्या अधिवेशनात उपस्थित केला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना उपचारांसाठी आर्थिक संकटाचा सामना करावा लागू नये आणि पात्र रुग्णांना धर्मादाय योजनेचा लाभ मिळावा, यासाठी त्यांनी सभागृहात आपली भूमिका ठामपणे मांडली.

अश्विनी पाटील यांच्या प्रकरणातही धर्मादाय योजनेअंतर्गत उपचारांचा लाभ न मिळाल्याने कुटुंबीयांना १० लाख २५ हजार रुपये भरावे लागल्याची बाब समोर आल्यानंतर आमदार अभिजीत पाटील यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा सुरू केला. त्यांनी पुणे विभागाच्या धर्मादाय सहआयुक्तांना पत्र देऊन संबंधित रुग्णालयाविरोधात तक्रार दाखल केली आणि रुग्णाला भरलेली रक्कम परत मिळवून देण्याची मागणी केली. विधानसभेतील आवाज आणि प्रशासकीय पातळीवरील पाठपुरावा यामुळे या प्रकरणाला महत्त्व प्राप्त झाले.

**नेमके प्रकरण काय?**

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील पटवर्धन कुरवली येथील सौ. अश्विनी सोमनाथ पाटील या २२ सप्टेंबर २०२५ रोजी उपचारासाठी ड्एट हॉस्पिटल, पुणे येथे दाखल झाल्या होत्या. त्यांच्यावर शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले होते. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संबंधित उपचार शासनाच्या योजनेअंतर्गत होऊ शकत असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले होते. मात्र, शस्त्रक्रियेपूर्वी अनामत रक्कम म्हणून १० लाख २५ हजार रुपये



भरण्यास सांगण्यात आले.

एवढी मोठी रक्कम उभी करताना रुग्णाच्या कुटुंबीयांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. धर्मादाय योजनेअंतर्गत उपचारांचा लाभ का मिळाला नाही, हा प्रश्न उपस्थित करत या प्रकरणात योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.

या प्रकरणाची सुनावणी आणि उपलब्ध कागदपत्रांचा विचार करून धर्मादाय सहआयुक्त तथा देखरेख समितीने तक्रार अर्ज क्रमांक १३/२०२६ मंजूर केला.

**रुग्णांच्या हक्कांसाठी आमदार अभिजीत पाटील यांचा ठाम पाठपुरावा!**

सर्वसामान्य नागरिकांना गंभीर आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक संकटाचा सामना करावा लागू नये, तसेच धर्मादाय योजनेचा लाभ पात्र रुग्णांपर्यंत पोहोचावा, यासाठी आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेच्या अधिवेशनात प्रश्न उपस्थित करण्यापासून ते धर्मादाय सहआयुक्तांकडे तक्रार करण्यापर्यंत सातत्याने पाठपुरावा केला.

विधानसभेत आवाज उठवून आणि प्रशासनाकडे प्रभावी पाठपुरावा करून रुग्णांच्या हक्कांचा प्रश्न ऐरणीवर आणणाऱ्या आमदार अभिजीत पाटील यांच्या प्रयत्नांमुळे अश्विनी पाटील यांच्या प्रकरणात दिलासादायक आदेश पारित झाला आहे. रुग्णांना न्याय मिळवून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी केलेल्या पाठपुराव्याचे हे महत्त्वपूर्ण उदाहरण ठरले आहे.

**१५ दिवसांत ₹१०.२५ लाख परत करण्याचे आदेश**

धर्मादाय सहआयुक्त तथा देखरेख समितीने ७ ऑक्टोबर २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार, KEM हॉस्पिटल, पुणे यांना सौ. अश्विनी सोमनाथ पाटील यांच्या नावाने ₹१०,२५,०००/- (दहा लाख पंचवीस हजार रुपये) इतक्या रकमेचा धनादेश आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत काढून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या आदेशामुळे संबंधित रुग्णाच्या कुटुंबीयांना भरलेली रक्कम परत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. धर्मादाय योजनेअंतर्गत पात्र रुग्णांना उपचारांचा लाभ मिळावा आणि अशा रुग्णांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये, या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

# ७ ते २८ ऑक्टोबरदरम्यान ८५ टन कचरा संकलित

## आजच्या श्रमदानातून २६ टन कचरा जमा

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर शहरातील चंद्रभागा वाळवंट परिसर स्वच्छ, सुंदर आणि निर्मळ ठेवण्याच्या उद्देशाने पंढरपूर नगरपरिषदेच्या पुढाकारातून राबविण्यात आलेले विशेष स्वच्छता अभियान उत्साहात संपन्न झाले. दि. ७ ते २८ ऑक्टोबर या कालावधीत एकूण ८५ टन कचरा संकलित करण्यात आला यामध्ये नागरिकांनी नदीपात्रात अर्पण केलेले वस्त्रे, धार्मिक साहित्य, निर्माल्य व इतर कचरा संकलित करण्यात आला असून आहे. आजच्या स्वच्छता मोहिमेत तब्बल २६ टन कचरा संकलित करण्यात आला. अशी माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

पंढरपूर नगरपरिषदेसह विविध सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हे अभियान राबविण्यात आले. यामध्ये इंडियन मेडिकल असोसिएशन, उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर, देशमुख जिम कट्टा ग्रुप, गुजराथी रुखी समाज बहुउद्देशीय सामाजिक संस्था, अनुलोम सामाजिक संस्था, आपटे उपलप प्रशाला, श्री विठ्ठल वारकरी शिक्षण संस्था, श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था आणि जोगदंड महाराज वारकरी शिक्षण संस्था अशा एकूण एक हजार जणांनी सहभाग घेतला होता.





या अभियानात ह.भ.प. रामभाऊ महाराज राऊत, ह.भ.प. डॉ. जयवंत महाराज बोधले, ह.भ.प. राणा महाराज वासकर, ह.भ.प. विष्णू महाराज कबीर, ह.भ.प. ठाकूरबुवा महाराज, ह.भ.प. उखळीकर महाराज, ह.भ.प. भागवत महाराज कबीर, ह.भ.प. ज्ञानेश्वर जोगदंड महाराज आणि ह.भ.प. रामकृष्ण महाराज वीर यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, स्वयंसेवक, विद्यार्थी आणि नागरिकांनी श्रमदान केले.

नगरपरिषदेच्या विविध विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. नगरसेवक ओंकार जोशी यांच्यासह अनेक नागरिकांनी स्वच्छता मोहिमेत योगदान दिले. समाजमाध्यमांवरून या उपक्रमाची माहिती मिळाल्यानंतर कल्याण येथील स्वच्छतादूत केतन वाकडे यांनीही स्वयंस्फूर्तीने सहभागी होत श्रमदान केले.

चंद्रभागा वाळवंट परिसरातील कचरा, प्लास्टिक आणि इतर घनकचरा संकलित करून परिसर स्वच्छ करण्यात आला. संकलित कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी व्यवस्था करण्यात आली. या उपक्रमातून सार्वजनिक स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, प्लास्टिकमुक्त परिसर आणि पर्यावरण संवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली असल्याचे ह.भ.प. रामभाऊ महाराज राऊत यांनी सांगितले.

पंढरपूर हे महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्र असून, श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक येथे येतात. चंद्रभागा नदी आणि वाळवंट परिसराला धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व असल्याने हा परिसर स्वच्छ व निर्मळ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची आणि भाविकाची सामूहिक जबाबदारी आहे. 'स्वच्छता हीच विठ्ठल सेवा', 'श्रमदानातून भक्ती' आणि 'सहभागातून स्वच्छता' या संदेशांतून स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले असल्याचे ह भ प जयवंत महाराज बोधले यांनी सांगितले.

**दर बुधवारी श्रमदान अभियान**

पंढरपूर शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि निर्मळ करण्यासाठी नगरपरिषदेच्या वतीने दर बुधवारी सकाळी ७.३० वाजता स्वच्छता व श्रमदान अभियान आयोजित करण्यात येते. आजचे श्रमदान हे या अभियानातील चौथे श्रमदान होते.

या अभियानात सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, विविध मंडळे आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले आहे. इच्छुक संस्थांनी पंढरपूर नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधून नोंदणी करावी, असेही आवाहनही मुख्याधिकारी श्री रोकडे यांनी केले आहे.

# उजनीवरील चार प्रस्तावित प्रकल्पांविरोधात सर्वपक्षीय आंदोलनाची गरज- उत्तरेश्वर कांबळे

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** उजनी जलाशयाच्या अस्तित्वाशी शासनाने खेळू नये अन्यथा शेतकऱ्यांच्या हितासाठी मोठे जन आंदोलन उभा करू असा इशारा देत उजनीवरील चार प्रस्तावित प्रकल्पांविरोधात सर्वपक्षीय आंदोलनाची गरज असल्याने सर्वांनीच गटतट विसरून एकत्र यावे असे आवाहन भीम आमीर्चे प्रदेशाध्यक्ष उत्तरेश्वर कांबळे यांनी केले आहे.

करमाळा येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. उजनी जलाशय म्हणजे केवळ पाण्याचा साठा नसून करमाळा आणि इंदापूर तालुक्यांतील शेतकरी, कष्टकरी, मच्छीमार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनाचा आधार आहे. अशा या उजनी जलाशयाच्या पाण्यावर आणि परिसरातील जागेवर अवलंबून असलेल्या उजनीवर एआय डेटा सेंटर, हायड्रोजन प्रकल्प, ऊर्जा प्रकल्प आदि इतर संबंधित प्रकल्प उभारण्याच्या प्रस्तावांवरून स्थानिक शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर, शेतकऱ्यांच्या



हिताचा प्रश्न राजकारणाच्या पलीकडे जाऊन सर्वपक्षीय एकजुटीने लढवला पाहिजे, अशी ठाम भूमिका भीम आमीर्चे प्रदेशाध्यक्ष उत्तरेश्वर कांबळे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केली आहे.

यावेळी बलभीम कांबळे, ओम गरड, सुखदेव गरड, प्रवीण कांबळे, सनी कांबळे, नामदेव कांबळे, शाहीर शिवाजी कांबळे, योगेश कांबळे, प्रशांत कांबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते. चार प्रकल्पांमुळे उजनी जलाशयाच्या पाण्याचा वापर, स्थानिक जमिनींचे भवितव्य, पर्यावरणीय परिणाम याबाबत शासनाने अद्याप सर्वसामान्य नागरिकांसमोर स्पष्ट व पारदर्शक माहिती मांडणे आवश्यक आहे. ती न मांडल्याने समस्येचे वातावरण निर्माण झालेले आहे त्यामुळे शासनाने विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या हक्कांवर गदा आणू नये विकासाच्या नावाखाली स्थानिक शेतकऱ्यांना त्यांच्या पाण्याच्या हक्काबाबत असुरक्षितता वाटत असेल, तर शासनाने त्याकडे दुर्लक्ष करणे योग्य ठरणार नाही. उजनी जलाशयाच्या पाण्यावर हजारो शेतकरी आणि अनेक गावांचे जीवन अवलंबून आहे. सिंचन, पिण्याचे पाणी, शेतीपूरक व्यवसाय आणि स्थानिक अर्थव्यवस्था या सर्व बाबींचा विचार न करता कोणताही निर्णय घेणे भविष्यात गंभीर प्रश्न निर्माण करू शकते. त्यामुळे प्रस्तावित प्रकल्पांसाठी शासनाने गंभीर व्हावे असे आवाहन भीम आमीर्चे प्रदेशाध्यक्ष उत्तरेश्वर कांबळे यांनी केले आहे. शासनाने तात्काळ या उजनी वरील प्रस्तावित प्रकल्पाचा फेरविचार करावा व तात्काळ हे प्रकल्प रद्द करावेत अन्यथा भीम आर्मी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करणार आहे असा इशारा दिला आहे.

# 'ध्यान हा जीवनातील प्रमुख भाग आहे'- नगरसेवक प्रथमेश कोठे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उत्तराखंडमधील ऋषिकेश येथील योग महोत्सव घाट, मुनी की रेती येथे ९ व्या महा योग-ध्यान कुंभात सोलापूरच्या साधकांनी लक्षणीय सहभाग नोंदवला. पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटीज मूव्हमेंटचे संस्थापक ब्रह्मर्षी सुभाष पत्रीजी यांच्या आशीवार्दाने आयोजित या आध्यात्मिक महाकुंभात देशभरातील ३० हजारहून अधिक साधक सहभागी झाले होते. यामध्ये महाराष्ट्रातील २ हजारहून अधिक आणि सोलापूर जिल्ह्यातील साधकांचा मोठ्या प्रमाणात समावेश होता.

पाच दिवस चाललेल्या या कुंभात साधकांनी दररोज पाच तासांहून अधिक काळ ध्यानसाधना केली. पिरॅमिड ध्यानपद्धती, स्वाध्याय, सज्जन संगती, विविध आध्यात्मिक उपक्रम आणि पवित्र गंगा आरतीमध्ये सहभाग घेत ध्यान,



आत्मज्ञान आणि विश्वशांतीचा संदेश दिला.

सोलापूरचे ध्यान मास्टर आणि नगरसेवक प्रथमेश महेश कोठे यांनी या महाकुंभात सलग तीन दिवस उपस्थित राहून साधना केली. यावेळी बोलताना त्यांनी, 'ध्यान हा केवळ उपक्रम नसून जीवनातील प्रमुख भाग आहे. नियमित ध्यानाने मन शांत, सकारात्मक आणि सशक्त होते,' असे सांगत सर्वांनी ध्यानाला दैनंदिन जीवनात स्थान द्यावे, असे आवाहन केले.

या सामूहिक साधनेमुळे सोलापूरच्या साधकांना आध्यात्मिक ऊर्जा, विचारांची देवाणघेवाण आणि सकारात्मक जीवनदृष्टीचा अनोखा अनुभव मिळाला.

# कल्याणशेट्टी माध्यमिक विद्यालयाचा क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व पंचायत समिती अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने घेतल्या गेलेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत कल्याणशेट्टी माध्यमिक विद्यालयाच्या सिद्धाराम जमादार हा 100 व 200 मीटर धावण्यात तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून जिल्हासाठी निवड झाली आहे. 17 वषार्खालील मुलांमध्ये 3000 मीटर धावण्यात संदीप चव्हाण हा तालुक्यात द्वितीय आला आहे. 17 वयोगटात श्रद्धा शहापुरे ही गोळा फेक व भालाफेक या दोन्ही खेळात तालुक्यात प्रथम आली आहे, 19 वषार्खालील मुलींमध्ये शगोपिया शेख ही लांब उडी व तिहेरी उडी मध्ये तालुक्यात प्रथम आली, अमन नदाफ हा 200 मीटर धावणे मध्ये प्रथम व 100 मीटर धावण्यामध्ये द्वितीय आला आहे. सुमित खांडेकर हा 58 किलो वजन गटात कुस्तीमध्ये तालुक्यात प्रथम आला आहे, तर गौरी झिंगाडे ही कराटे व तायक्वांदो खेळात तालुक्यात प्रथम आली आहे. प्रणाली पूल्लूर ही हातोडा फेक मध्ये द्वितीय, तर 4100 रिले व 4400 रिले मुलामध्ये तालुक्यात प्रथम.

तालुकास्तरीय सांघिक हॉलीबॉल स्पर्धेत 14 वर्षे वयोगटातील मुलीमध्ये तालुक्यात प्रथम, तर 19 वर्षे मुलीच्या क्रिकेट स्पर्धेत तालुक्यात प्रथम. 19 वर्षे खालील मुलांमध्ये कबड्डीत तालुक्यात प्रथम येऊन बाजी मारली आहे.

सर्व यशस्वी खेळाडूंचे व मार्गदर्शक क्रीडा शिक्षक कुमार जाधव व श्रीशैल किणगे यांचे संस्थेचे अध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी, संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संस्थेच्या संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, ज्युनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभागप्रमुख रूपाली शहा, प्रशालेचे मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी अभिनंदन केले आहे.

# 'जन आरोग्य संवाद यात्रे'च्या नियोजनाचा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड यांच्याकडून आढावा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने १ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२६ या कालावधीत राज्यभर राबविण्यात येणाऱ्या 'जन आरोग्य संवाद यात्रे'च्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील पूर्वतयारी व नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद, सोलापूर येथे आढावा बैठक पार पडली.

या बैठकीस सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. मोहन शेगर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल जाधव, आरबीएसके नोडल अधिकारी डॉ. इरफान सय्यद, जिल्हा सांख्यिकी अधिकारी हेमंत पवार, एम अँड एनई समन्वयक अरुण खडके, एनक्यूएएस प्रमुख निखिल फटाटे, सर्व कार्यक्रम समन्वयक, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व सार्वजनिक आरोग्य परिचारिका उपस्थित होत्या.

**आरोग्य संस्थांची प्रत्यक्ष पाहणी आणि लाभार्थ्यांशी संवाद**

सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांच्या प्रस्तावित जिल्हा दौऱ्याच्या अनुषंगाने या यात्रेचे नियोजन करण्यात येत आहे. यात्रेदरम्यान आरोग्य संस्थांची प्रत्यक्ष पाहणी करून आरोग्य सेवांची उपलब्धता, गुणवत्ता आणि अंमलबजावणीचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच विविध आरोग्य योजनांच्या लाभार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी व अनुभव जाणून घेण्यावर भर देण्यात येणार आहे.



**समित्या, रुग्णालये आणि आरोग्य सेवांचा आढावा**

यात्रेदरम्यान ग्रामीण व जिल्हास्तरीय एकात्मिक आरोग्यवर्धिनी समित्या, रुग्ण कल्याण समित्या, जन आरोग्य समित्या तसेच ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्यांच्या कामकाजाचा आढावा घेतला जाणार आहे. जिल्हा, उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत शाळा व अंगणवाड्या तसेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेशी संलग्न खासगी रुग्णालयांचीही पाहणी करण्यात येणार आहे.

**विविध योजनांच्या लाभार्थ्यांच्या घरी भेटी**

प्रशामक उपचार घेणारे रुग्ण, सिकलसेल रुग्ण, संस्थात्मक प्रसूती झालेल्या माता, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत शस्त्रक्रिया झालेली बालके, क्षयरुग्ण, जननी सुरक्षा योजनेचे लाभार्थी, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे लाभार्थी तसेच कर्करोग तपासणी मोहिमेतील लाभार्थ्यांच्या घरी भेटी देण्याचे नियोजन आहे. या भेटींतून लाभार्थ्यांना मिळणाऱ्या आरोग्य सेवांची स्थिती आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या जाणार आहेत.

**आरोग्य सुविधांच्या गुणवत्तेवर विशेष लक्ष**

'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' अभियान, 'तिशीचा पल्ला' उपक्रमांतर्गत ३० वर्षांवरील व्यक्तींची तपासणी व आरोग्यविषयक सल्ला, औषधांचा साठा, वैद्यकीय उपकरणांची उपलब्धता, मनुष्यबळ, स्वच्छता, पाणीपुरवठा, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन, संदर्भ सेवा, रुग्णवाहिका तसेच बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवांची तपासणी करण्यात येणार आहे.

**माहिती अद्ययावत ठेवण्याचे निर्देश**

या वेळी डॉ. सतीश कोपुरवाड यांनी सर्व तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांना आपापल्या कार्यक्षेत्रातील आरोग्यविषयक माहिती भौतिक व आर्थिक बाबींसह अद्ययावत ठेवण्याच्या सूचना दिल्या. 'जन आरोग्य संवाद यात्रा' हा शासन आणि जनता यांच्यातील आरोग्यविषयक संवादाचा महत्त्वाचा दुवा असून, यात्रेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या दारी झी २४ तासची 'आनंदाची दिवाळी'!

## शेतकऱ्यांना मिठाई व साड्यांचे वाटप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील दुष्काळाची दाहकता लक्षात घेऊन झी मीडियाच्या 'झी २४ तास' या मराठी वृत्तवाहिनीच्या वतीने उत्तर सोलापूर तालुक्यातील शिवणी गावात दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली. 'आनंदाची दिवाळी' या उपक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण फुलवण्याचा संवेदनशील प्रयत्न करण्यात आला. मराठी चित्रपट अभिनेते प्रवीण तरडे आणि झी २४ तासचे मुख्य संपादक कमलेश सुतार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम उत्साहात पार पडला.

मागील वर्षी महापुरामुळे झालेल्या नुकसानीच्या जखमा ताज्या असतानाच यंदा कोरड्या दुष्काळाचे संकट शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले आहे. नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिवाळीच्या निमित्ताने हास्य फुलवण्यासाठी झी २४ तासच्या टीमने थेट शिवणी गाव गाठले. शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत त्यांच्या सोबत दिवाळी साजरी करण्यात आली.



यावेळी अभिनेते प्रवीण तरडे आणि मुख्य संपादक कमलेश सुतार यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या आणि परिस्थिती जाणून घेतली. शेतकऱ्यांच्या घरांसमोर आकाशकंदील लावून, पणत्या प्रज्वलित करत दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच शेतकरी कुटुंबांना भेटवस्तू म्हणून मिठाई आणि साड्यांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर फटाक्यांची आतषबाजी करत गावकऱ्यांसोबत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

**संकटातही माणुसकीचा प्रकाश!**

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांच्या आयुष्यात आनंदाचे काही क्षण निर्माण करणे, त्यांच्या दुःखात सहभागी होणे आणि त्यांना आपलेपणाची जाणीव करून देणे, हा 'आनंदाची दिवाळी' उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. झी २४ तासच्या या उपक्रमामुळे शिवणी गावातील शेतकरी कुटुंबांसोबत दिवाळीचा आनंद सामायिक करण्यात आला.

या कार्यक्रमाला झी २४ तासचे मुख्य संपादक कमलेश सुतार यांच्यासह नितीन ढब्बू, गणेश मोरे, अभय किन्हीकर, अनुपमा खानविलकर, अभिषेक आदेप्पा, सचिन गुंड, सोमनाथ राऊत, लखन गुंड, धनाजी गुंड, प्रमोद गुंड आदी झी २४ तासच्या टीममधील सदस्य उपस्थित होते. तसेच गावातील शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# दक्षता जनजागृतीतून पारदर्शक व भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाचा संकल्प



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त समाजामध्ये भ्रष्टाचार निर्मूलनाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने पंचायत समिती दक्षिण सोलापूर व उप उपविभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेतली.

गटविकास अधिकारी मनोज राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सदर उपक्रम राबविण्यात आला. यावेळी माननीय राज्यपाल व माननीय मुख्यमंत्री यांनी दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त दिलेल्या संदेशाचे प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांसमोर वाचन करून दाखविले. या उपक्रमाच्या माध्यमातून अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचे पालन करून भ्रष्टाचारमुक्त प्रशासनासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प व्यक्त केला.

यावेळी प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे, मनिषा वास्ते विस्तार अधिकारी श्रीमती मृणालिनी शिंदे, ज्योतीराम भोसले, सुरेश राठोड, शिवानंद सोलापूरे संदीप घोडके, शहानवाज शेख, श्रीमती सुरेखा तोंडसे, रूपाली मोरे, स्नेहा जाधव, अजीज सय्यद, श्रीकांत माने, जिलानी अंसारी, शिवानंद नागूर, गजेंद्र कुमठेकर, मिलन बिराजदार, विनायक कुंचपोर, सुधीर फुलारी, भिमाशंकर कोळी, श्रीमती अरुणा राजणे, कैलास शिंदे, पंडित होनमाने, कंत्राटी कर्मचारी श्रीमती अश्विनी बिराजदार, दिपाली धेंडे, आरती महिंद्रकर, गौरी तुपे व युवराज यादव उपस्थित होते.

# शूटिंग बॉल स्पर्धेत सोशल उर्दू हायस्कूलला विजेतेपद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका व सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयांतर्गत दि. २३/१०/२६ रोजी सुभाष उद्यान येथे १७ वषार्खालील शूटिंग बॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पधेर्चा अंतिम सामना सोशल उर्दू हायस्कूल आणि सोशल इंग्लिश मीडियम स्कूल यांच्यात झाला. अत्यंत अटीतटीच्या सामन्यात एस.




ए. सोशल उर्दू हायस्कूलने विजय मिळवला आणि विभागीय स्तरावरील सामन्यासाठी पात्रता मिळवली. या स्पर्धेत उमरफारुख बद्दी, नोमान धोटेघर, अफवान पतलबाप आणि इस्माईल अत्तार यांचे विशेष उत्कृष्ट प्रदर्शन राहिले. संघातील खेळाडूंना अ. रहिम शेख, अलिम शेख, अवेज मर्चंट आणि कामरान दलाल यांचे मार्गदर्शन लाभले.

या संघाला व मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. डॉ. अखलाक वडवान, सहसचिव इम्तियाज शेख, मुख्याध्यापक रसूल चौधरी, उपमुख्याध्यापक इम्तियाज शाब्दी, पर्यवेक्षिका यास्मिन शेख, पर्यवेक्षक अल्ताफ कुमठे आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.